मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले





● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २९५ ■ बुधवार, ०८ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा २४ बाय ७ 'अलर्ट मोड'वर ठेवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी : मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग 50 ते 70 किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच आज दुपारी 3 ते 4:30 वाजण्याच्या दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी 24 बाय 7अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले. ते राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षातून आढावा घेतला त्यावेळी नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत प्रसंगीते मार्गदर्शन करताना म्हणाले.**

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई आणि किनारी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह




पाऊस अपेक्षित आहेत. अपेक्षित उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना 'अलर्ट मोड'वर ठेवण्यात आले आहेत. पुराची परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने 'एसडीआरएफ' आणि 'एनडीआरएफ' ची पथके रवाना करण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तातडीने मदत मिळेल, याची काळजी घ्यावी.राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून महामार्गावरील मलबा हटविण्यात यावा. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य दरड कोसळणाऱ्या ठिकाणी पथके सज्ज ठेवावीत. तसेच मुंबई-गोवा महामार्गावर यावेळी अनपेक्षित ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून दरडीचा मलबा तात्काळ हटविण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अरबी समुद्रावर बनत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात उद्या ढगफुटी सदृश्य पाऊस होण्याची दाट शक्यता आहे. हा पाऊस बऱ्यापैकी त्र्यंबकेश्वर व आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे 300 मिलिमीटर पाऊस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात.व नाशिक व त्रंबकेश्वर परिसरातील पर्यटकांची विशेष खबरदारी घ्यावी कुठेही जीवित हानी होणार नाही, याबाबतही दक्ष रहावे.

या प्रसंगी प्रसार मध्यमानबरोबर मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला, तेम्हणले मुंबई शहरात एका महिन्याच्या सरासरी इतका पाऊस अवघ्या चार दिवसांत नोंदवण्यात आला आहे. विशेषतः भरतीच्या काळात अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर आपत्तीजन्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रित ठेवण्यात यश आले आहे. काल मुंबई शहरात ताशी 50 किलोमीटर वेगाने वारे वाहताना निदर्शनास आले. यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. साधारणपणे संपूर्ण चार महिन्यांच्या मान्सूनमध्ये जितकी झाडे पडतात, त्यापैकी जवळपास 300 झाडे एकाच दिवशी पडली आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

येत्या काही दिवसांत, म्हणजे 8जुलैच्या रात्रीपर्यंत, हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. सर्व जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे. दरम्यान, भूस्खलनाच्या घटनाही समोर आल्या आहेत. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. अशा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करावा. खाजगी आस्थापनांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांना वर फ्रॉम होम जे सवलत द्यावी असे न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला. सर्व यंत्रणांनी अत्यंत सतर्क राहून अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. पुढील 48 तास 'शून्य बळी' हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी, असेही भूमीका यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली.

बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त यांच्याकडून संबंधित विभागाचा आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, बृहन्मबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, प्रधान सचिव (नगरविकास) के. एच. गोविंदराज, प्रधान सचिव (जलसंपदा) एकनाथ डवले,मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सचिव (आरोग्य) ई. रविंद्रन, संचालक श्री. चव्हाण आदी उपस्थित होते




# SIR च्या कामात कोणतीही हयगय नको; सर्वांनी जबाबदारीने सहकार्य करावे – उपविभागीय अधिकारी राऊत साहेब

## मुदतीपूर्वी SIR चे काम पूर्ण करण्यासाठी शासनाचा निर्धार-सौ.सुरेखा स्वामी, तहसीलदार

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सूर्यकार** : विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (SIR) अभियानाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, धर्माबाद येथे सोमवारी (दि. ६ जुलै) दुपारी २ वाजता तालुक्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र चालक तसेच रोजगार हमी योजनेतील कर्मचाऱ्यांची महत्त्वपूर्ण मार्गदर्शन बैठक संपन्न झाली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी नूतनच रुजू झालेले उपविभागीय अधिकारी श्री. राऊत साहेब हे होते. यावेळी तहसीलदार सौ. सुरेखा स्वामी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. कौस्तुभ गव्हाणे, गटविकास अधिकारी श्री. हैबती यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात तहसीलदार सौ. सुरेखा स्वामी यांनी सांगितले की, स्वतंत्र भारतानंतर राबविण्यात येणारी ही आठवी SIR प्रक्रिया असून ती अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय



जबाबदारी आहे. शासनाने या कामासाठी विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच आपले सरकार सेवा केंद्र चालक यांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे प्रत्येकाने राष्ट्रीय कर्तव्याची भावना ठेवून जबाबदारीने काम करावे. शासनाने दिलेल्या मुदतीपूर्वी SIR चे काम पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने व प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी त्यांनी ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या तांत्रिक अडचणी, आवश्यक कागदपत्रे, अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, पडताळणीची प्रक्रिया तसेच कामकाजातील विविध बाबींचे सविस्तर मार्गदर्शन केले. प्रोजेक्टरच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून संपूर्ण प्रक्रिया सोप्या व प्रभावी पद्धतीने समजावून सांगितली.

मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी श्री. राऊत साहेब यांनी SIR अभियान हे अत्यंत संवेदनशील व राष्ट्रीय महत्त्वाचे काम असल्याचे सांगितले. या कामात कोणत्याही प्रकारची हयगय, निष्काळजीपणा किंवा दिरंगाई सहन केली जाणार नाही. प्रत्येकाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून शासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

त्यानंतर तहसील कार्यालयातील श्री. वाघमारे तसेच तंत्रज्ञान सहाय्यक श्री. साहेबराव कदम यांनी प्रोजेक्टरच्या साहाय्याने ऑनलाइन प्रणालीचा वापर, अर्ज भरण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, डेटा अपलोड करण्याची पद्धत तसेच उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर उपाययोजना याबाबत उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. उपस्थितांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचीही त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

या बैठकीस धर्माबाद तालुक्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र चालक, रोजगार हमी योजनेतील कर्मचारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी SIR अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने, समन्वयाने आणि राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव ठेवून काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# लिंगोरचा' ते 'लगोरी' : पारंपरिक खेळाचा राष्ट्रीय क्रीडा प्रवास; गावागावांत लगोरी रुजविण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : भारतीय संस्कृतीतील पारंपरिक खेळांना नवसंजीवनी देत महाराष्ट्रात "लिंगोरचा" म्हणून ओळखला जाणारा खेळ आज "लगोरी" या नावाने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. या खेळाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची संधी उपलब्ध होत असून, प्रत्येक गाव व शाळेत लगोरीचा प्रसार व्हावा, असे आवाहन राष्ट्रीय लगोरी खेळाडू, क्रीडाशिक्षक व राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक तसेच "क्रीडा सह्याद्री"चे अध्यक्ष विलास गायकवाड यांनी केले आहे.



भारतीय संस्कृतीत सण-उत्सव, लोककला, संतपरंपरा यांच्याबरोबरच पारंपरिक खेळांचेही महत्त्व अनन्यसाधारण आहे. मात्र आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे अनेक पारंपरिक खेळ कालांतराने मागे पडले. अशा परिस्थितीत लगोरी या खेळाने काळानुरूप स्वतःमध्ये बदल स्वीकारत राष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात मानाचे स्थान मिळवले आहे.

गायकवाड यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील लाखो मुलांचे बालपण "लिंगोरचा" खेळतच गेले. विटांच्या किंवा फरशीच्या चकत्या रचून चेंडूने त्या पाडणे आणि पुन्हा रचण्यासाठी संघर्ष करणे हा केवळ खेळ नसून बालपणातील अविस्मरणीय अनुभव होता. आज त्याच खेळाचे आधुनिक नियमांसह राष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक स्वरूप विकसित झाले आहे.

या खेळाला संघटित आणि आधुनिक रूप देण्याचे ऐतिहासिक कार्य क्रीडा महर्षी, क्रीडा रत्न तथा लगोरी खेळाचे जनक कै. संतोष गुरव यांनी केले. त्यांनी नियमावली, मैदानाची आखणी, पंचगिरीची पद्धत आणि स्पर्धांचे स्वरूप निश्चित करून या पारंपरिक खेळाला राष्ट्रीय ओळख मिळवून दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज देशभर जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील लगोरी स्पर्धा नियमितपणे आयोजित केल्या जात असून हजारो खेळाडू राज्याचे प्रतिनिधित्व करत आहेत.

राष्ट्रीय लगोरी खेळाडू म्हणून स्वतःलाही खेळण्याची संधी मिळाल्याचे सांगताना गायकवाड यांनी नमूद केले की, लगोरी हा खेळ केवळ शारीरिक तंदुरुस्ती वाढवत नाही, तर आत्मविश्वास, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघभावना आणि मानसिक ताकदही विकसित करतो. वेग, चपळता, अचूक लक्ष्य आणि रणनीती यांचा सुंदर मिलाफ असलेला हा खेळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

सध्या १२, १४, १७ व १९ वर्षांखालील तसेच खुल्या गटातील लगोरी स्पर्धा नियमित होत आहेत. शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये या खेळाचा समावेश झाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावर चमकण्याचे नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

लगोरीची आणखी एक जमेची बाजू म्हणजे हा खेळ अत्यंत कमी खर्चात खेळता येतो. लगोरी संच, टेनिसचा चेंडू आणि मोकळे मैदान एवढ्याच साधनांमध्ये हा खेळ खेळला जाऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक शाळा, गाव आणि क्रीडा संस्थेने या खेळाला प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

मोबाईल आणि डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे मुलांचा मैदानी खेळांकडे असलेला कल कमी होत असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी लगोरीसारखे पारंपरिक खेळ मुलांना पुन्हा मैदानाशी जोडू शकतात, असे मत व्यक्त केले. हा खेळ मुलांना संघर्ष, पराभव स्वीकारणे, पुन्हा उभे राहणे आणि संघासाठी लढणे शिकवतो, असेही त्यांनी नमूद केले.

**राष्ट्रीय खेळाडू तथा क्रीडाशिक्षक विलास गायकवाड यांचे प्रतिपादन; भारतीय संस्कृती, परंपरा आणि क्रीडा संस्कार जपण्यासाठी लगोरीला चालना देण्याची गरज**

महाराष्ट्र लगोरी स्पोर्ट्स असोसिएशनकडून गावागावांत व शाळांमध्ये लगोरीचा प्रसार करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे सांगत क्रीडाशिक्षक, पालक, शाळा, सामाजिक संस्था आणि शासन यांनी एकत्र येऊन या खेळाच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

भारतीय सांस्कृतिक परंपरेशी जोडलेल्या या खेळाला भविष्यात राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही मानाचे स्थान मिळेल, असा विश्वास व्यक्त करत गायकवाड यांनी प्रत्येक गावात लगोरीचे मैदान उभे राहावे, प्रत्येक शाळेत नियमित सराव सुरू व्हावा आणि प्रत्येक मुलाच्या हातात मोबाईलऐवजी चेंडू दिसावा, हीच खरी भारतीय क्रीडा संस्कृतीची जपणूक असल्याचे प्रतिपादन केले.

# बापुसाहेब घोडेस्वार राज्यस्तरीय "आदर्श पत्रकार" पुरस्काराने सन्मानित

## 'या पुरस्काराने साकत तसेच जामखेड तालुक्याची ची मान उंचावली'

**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार** : तालुक्यातील साकत गावचे शेतकरी कुटुंबातले असणारे भूमी पुत्र बापुसाहेब रावसाहेब घोडेस्वार यांचा राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्काराने अहिल्यानगर येथे मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



महाराष्ट्र राज्य यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व सामाजिक संस्था केडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शाल, फेटा, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते.यावेळी प्रमुख पाहुणे अहिल्यानगर शहराचे राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार संग्राम भैया जगताप,पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी अरणेश्वर महाविद्यालय प्राचार्य तुळशीराम भोजने सर, जय मल्हार सामाजिक शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल जाडकर, कार्यक्रमाचे चीफ मिरजगांवाचे मुख्याध्यापक अशोक सूर्यवंशी पत्रकार, प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळयासाठी पुण्यातील हिरकणी महिला संस्थेच्या अध्यक्षा शर्मिलाताई नलवडे, पुणे महानगर पालिका क्रीडा विभाग साहाय्यक आयुक्त सौ. रेश्मा पुणेकर, ज्योती पवार मॅडम, नाशिकचे जेष्ठ समाज सेवक मच्छिन्द्र बीडगर, भिमराव माधव, ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. आबासाहेब यादव सर, राजेंद्र पोकळे, शिवदास काळे, सौ. शोभाताई विवेक पंडित, साई सागर पंडित,जावखेडे खालसा येथील शिवाजीराव वाघ,शहाबुद्दीन भाई शेख, आंबेडकर चळवळीतील नेते अमोल जाधव,अंकुश जगताप, भास्करराव नेहूल, दिवटे महाराज उपस्थित होते.

पत्रकार सुनील नजन यांनी सूत्रसंचालन केले. तर अजय जाडकर यांनी आभार मानले.

'आदर्श पत्रकार' पुरस्काराने जामखेडची, साकतची मान उंचावली

गेल्या १३ वर्षांपासून बापुसाहेब घोडेस्वार यांनी सत्य, निर्भीड, निष्पक्ष पत्रकारिता जिल्हा स्तरीय, तालुका स्तरीय, गावागावातील तळागाळातील, शैक्षणिक, सामाजिक प्रश्न पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्यासाठी बापुसाहेब घोडेस्वार यांनी पत्रकारितेचा वापर केला.याची दखल घेत महाराष्ट्र राज्य यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व सामाजिक संस्था केडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार देण्यात आला. युवा पत्रकारने जामखेड तालुक्याची तसेच साकत गावची मान उंचावली आहे '

या पुरस्कारामुळे बापुसाहेब घोडेस्वार यांना त्यांच्या कार्याला विविध स्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा भेटत आहेत."

# पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ८१वा वर्धापनदिन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटीचा 81वा वर्धापन दिन सोहळा उद्या दि. 8 जुलै रोजी मुंबईत, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दिली आहे.

पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या 81 व्या वर्धापन दिनानिमीत्त आयोजित सोहळयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार वितरण अनेक मान्यवरांना करण्यात येणार आहे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या 81व्या वर्धापन दिन सोहळयास महाराष्ट्राचे राज्यपाल मा. जिष्णु देव वर्मा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्यासोबत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, महाराष्ट विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खासदार उज्वल निकम, पदमश्री अशोक खाडे, यांच्यासह अनेक मान्यंवर या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे भूषविणार आहेत.

पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वतीने विविध मान्यवरांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने दरवर्षी गौरविण्यात येते. यंदा सुध्दा पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या 81व्या वर्धापनदिना निमीत्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अवॉर्ड 2026 च्या पुरस्काराने महाराष्ट्र राज्य

**राज्यपालांच्या हस्ते अनेक मान्यवरांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराचे वितरण होणार**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, महाराष्ट विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, आमदार निलमताई गो-हे, शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, मुंबई विद्यापीठाचे रजिस्ट्रार प्रसाद कारंडे, विद्या विकास एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी डॉ. विनय राऊत, सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. रमेश खानविलकर, सिध्दार्थ कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स, सायन्सचे प्रिन्सीपल अशोक सुनतकरी, छत्रपती संभाजीनगर मधील एज्युकेशन कॉलेजचे प्रिन्सीपल डॉ. शिवाजी सुर्यवंशी ; सिध्दार्थ नाईट हायस्कुलचे प्रिंसीपल श्री. विजय मोहिते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर बालवाडी कोल्हापुरचे नंदकुमार गोंधळी, के जे सोमय्या कॉलेजचे आर्ट आणि कॉमर्सचे प्रिन्सीपल डॉ. किशन पवार, एनसीआरटीसी टाझा स्कुलचे सीईओ जयरामण सुब्रहमण्यम, पद्मश्री अशोक आबा खाडे, डॉ. विजय मोरे, एसएनईसी युनिव्हर्सीटीचे बोर्ड मेंबर डॉ. अखील शहानी, मिलींद कॉलेज ऑफ आर्ट संभाजीनगरचे वैशाली प्रधान, सिध्दार्थ कॉलेज ऑफ समावेशचे डॉ.विष्णु भंडारी, या मान्यवरांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने राज्यपाल महामहिम जिष्णु देव वर्मा यांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे अशी माहिती पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली आहे.

# रेवदंड्यात माणुसकीचा हात; पूरग्रस्तांच्या मदतीला धावले उपसरपंच संतोष (बाबू) मोरे

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** मुसळधार पावसामुळे रेवदंडा गावातील आंग्रे नगर परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरून नागरिकांचे मोठे नुकसान झाले असताना, संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी रेवदंडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच संतोष (बाबू) मोरे यांनी तातडीने पुढाकार घेत पूरग्रस्तांना किराणा किटचे वाटप केले. संकटकाळात लोकप्रतिनिधी म्हणून केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे करत त्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.आंग्रे नगर परिसरातील अनेक कुटुंबांच्या घरात पाणी शिरल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले होते. अशा परिस्थितीत उपसरपंच संतोष (बाबू) मोरे यांनी प्रभावित कुटुंबांची भेट घेत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेल्या किराणा किटचे वितरण करून गरजू कुटुंबांना मोठा दिलासा दिला.



यावेळी आंग्रे नगरमधील कार्यकर्ते दिलीप धुमाळ यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी प्रत्येक घरात जाऊन स्वतः किराणा किट पोहोचवण्याची जबाबदारी पार पाडत मदतकार्य अधिक प्रभावी केले. पूरग्रस्त कुटुंबांपर्यंत मदत थेट पोहोचावी यासाठी त्यांनी केलेल्या परिश्रमांचेही नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.या मदतीबद्दल आंग्रे नगरमधील नागरिकांनी उपसरपंच संतोष (बाबू) मोरे यांचे मनापासून आभार व्यक्त केले. "पूरामुळे आम्ही मोठ्या अडचणीत सापडलो होतो. अशा वेळी कोणतीही अपेक्षा न ठेवता मदतीला धावून आलेले बाबू मोरे आमच्यासाठी देवदूतच ठरले आहेत," अशा भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केल्या.

रेवदंडा हे रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे गाव म्हणून ओळखले जाते. जिल्ह्याच्या आणि राज्याच्या राजकीय घडामोडींवर प्रभाव टाकणारे गाव अशी रेवदंड्याची स्वतंत्र ओळख आहे. या गावातील लोकप्रतिनिधी संकटकाळात जनतेच्या पाठीशी किती ठामपणे उभे राहतात, याचे प्रत्यंतर संतोष (बाबू) मोरे यांच्या या कृतीतून पुन्हा एकदा आले आहे.आजच्या काळात अनेकदा लोकप्रतिनिधींवर टीका होत असताना, संकटात सापडलेल्या नागरिकांच्या घरापर्यंत मदत पोहोचवून संतोष (बाबू) मोरे यांनी "सेवा हीच खरी लोकप्रतिनिधीची ओळख" असल्याचे दाखवून दिले आहे. पूरग्रस्तांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी पुढे सरसावलेला हा माणुसकीचा हात रेवदंडा परिसरात चर्चेचा विषय ठरत असून, त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

"संकटात धावून येणारा हातच खरा आधार असतो; आणि रेवदंड्यात हा आधार बनले आहेत उपसरपंच संतोष (बाबू) मोरे," अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# शिर्डीत प्रा. संजय मोरे व मायाताई मोरे दाम्पत्याला 'साई प्रेरणा गौरव'

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर विभागीय संपादक :** सिंगणूर येथील रहिवासी प्रा. संजय मोरे व सौ. मायाताई संजय मोरे या दाम्पत्याचा शिर्डी येथील साईनगरीत आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते 'साई प्रेरणा गौरव पुरस्कार' प्रदान करून गौरव करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या क्षेत्रात सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना शाल, सन्मानचिन्ह (ट्रॉफी) आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन, महाराष्ट्र राज्य (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि मध्यप्रदेश या राज्यांतील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य



करणाऱ्या १०१ मान्यवरांचा गौरव करण्यात आला. प्रा. संजय मोरे हे अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष तसेच मानव अधिकार आंतरराष्ट्रीय फेडरेशन, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून सामाजिक बांधिलकी जपत विविध लोकहिताचे उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या कार्यात सौ. मायाताई मोरे यांचेही मोलाचे योगदान राहिले असून, या दाम्पत्याच्या कार्याचा गौरव या पुरस्काराद्वारे करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, श्री साईबाबा व श्री गणेश यांच्या प्रतिमेचे पूजन आणि आरतीने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनेत्री अलका कुबल होत्या. यावेळी ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शनचे अध्यक्ष सुदाम संसारे, कार्याध्यक्ष प्रा. संजय मोरे, निलेश वाघ, उपाध्यक्ष वंदना गव्हाणे, सरचिटणीस भूषण सरदार, संयोजक आकाश वाघमारे, शंकरराव कन्हेरकर, स्वागताध्यक्ष योगिता दांडगे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना अभिनेत्री अलका कुबल यांनी शिर्डीच्या पावन भूमीत आयोजित या प्रेरणादायी सोहळ्यात सहभागी होणे हे आपले भाग्य असल्याचे सांगितले. समाजासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे ही अत्यंत आनंदाची बाब असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक विचारांना चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले. तसेच पुरस्कारप्राप्त सर्व मान्यवरांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

प्रा. संजय मोरे व सौ. मायाताई मोरे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडियाचे सुप्रीमो डॉ. नरेंद्र अरोरा, सर्वशक्ती सेनेचे सुप्रीमो तथा हरियाणा शिवसेना राज्याध्यक्ष नीरज सेठी, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, माजी मंत्री बबनराव घोलप, आमदार अमोल हरीभाऊ जावळे, आमदार नंदकिशोर महाजन, आमदार चंद्रकांत पाटील, प्रल्हाद बोंडे, इंजी. वैष्णवी मोरे तसेच विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# पुराच्या विळख्यातून दोन नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलांची सुखरूप सुटका

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** पेण तालुक्यातील रावे आणि तांबडशेत या गावांना पुराच्या पाण्याने वेढा दिलेला असताना प्रसूतीची वेळ जवळ आलेल्या दोन नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलांची जिल्हा प्रशासनाच्या तत्परतेमुळे आणि प्रशिक्षित 'आपदा मित्रां'च्या धाडसी प्रयत्नांमुळे सुखरूप सुटका करण्यात आली. ; जिल्हा प्रशासनाची तत्परता अन् 'आपदा मित्रां'च्या या धाडसाला सलाम; पुराच्या पाण्याचा वेग, गावांना पडलेला पाण्याचा वेढा आणि मार्गाचा अंदाज घेण्यातील मोठी जोखीम अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे यांनी लागोपाठ दोन बचाव मोहिमा यशस्वी केल्या. दोन्ही गर्भवती महिलांना सुरक्षितपणे बाहेर काढून वेळेत वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीचे सभापती वैकुंठ पाटील यांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदेश शिर्के यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून रावे, ता. पेण येथील पायल राजेश पाटील (वय 23 ) या नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता असल्याची माहिती दिली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिर्के यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांना ही माहिती दिली. आणि तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांना तातडीने बचाव पथक पाठविण्याच्या सूचना दिल्या. मात्र, रावे गावाला पुराच्या पाण्याचा पूर्णपणे वेढा पडला होता. गावापर्यंत पोहोचण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग उपलब्ध नव्हता. त्यामुळे बोटीच्या माध्यमातूनच बचावकार्य



करणे आवश्यक होते. पुराच्या पाण्याला मोठा वेग होता. तसेच पाण्याच्या वाढलेल्या पातळीमुळे मासेमारीची बोट घटनास्थळापर्यंत नेणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत बचाव मोहीम राबविणे अत्यंत जोखमीचे होते.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक आणि पेणचे उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी तातडीने समन्वय साधून शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या रबर बोटीचा वापर करण्याचा निर्णय घेतला. पुराच्या पाण्याचा वेग आणि मार्गाचा अचूक अंदाज घेणे कठीण असतानाही आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण घेतलेले आपदा मित्र अभिकेत म्हात्रे यांनी धाडसाने पुढाकार घेतला. त्यांना आपदा मित्र राजेश म्हात्रे यांनी साथ दिली. दोन्ही आपदा मित्रांनी आपल्या प्रशिक्षणाचा आणि कौशल्याचा प्रभावी वापर करून रबर बोट

## रावेपाठोपाठ तांबडशेतमध्येही यशस्वी बचाव मोहीम

पुराच्या पाण्यातून सुरक्षितपणे रावे गावातील गर्भवती महिला असलेल्या ठिकाणापर्यंत नेली. त्यानंतर अत्यंत काळजीपूर्वक बचावकार्य राबवत पायल राजेश पाटील यांच्यासह त्यांच्यासोबत असलेल्या अन्य चार जणांना रबर बोटीतून सुरक्षितपणे किनाऱ्यावर आणण्यात आले. बचाव पथक किनाऱ्यावर पोहोचण्यापूर्वीच प्रशासनाने रुग्णवाहिका सज्ज ठेवली होती. त्यामुळे कोणताही वेळ न दवडता पायल राजेश पाटील यांना तातडीने पेण येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रावे येथील अत्यंत जोखमीचे बचावकार्य पूर्ण होते न होते, तोच दुसरा मदतीचा कॉल आला यामध्ये प्रशासनाला तांबडशेत गावातून आणखी एक तातडीचा मदतीचा संदेश प्राप्त झाला. तांबडशेत गावातही एक नऊ महिन्यांची गर्भवती महिला पुराच्या पाण्यात अडकली होती. तिलाही तातडीने सुरक्षितस्थळी आणून वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देणे आवश्यक होते.

पहिल्या मोहिमेतील आव्हाने आणि जोखीम यांना सामोरे गेल्यानंतरही क्षणाचाही विलंब न करता आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे पुन्हा दुसऱ्या बचाव मोहिमेसाठी सज्ज झाले. प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या समन्वयातून त्यांनी तांबडशेत गावाकडे धाव घेतली.

पुराच्या पाण्यातून मार्ग काढत या दोन्ही आपदा मित्रांनी दुसरी बचाव मोहीमही यशस्वीपणे पूर्ण केली. तांबडशेत येथील नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेलाही सुरक्षितपणे पुराच्या विळख्यातून बाहेर काढण्यात आले आणि तिला आवश्यक वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

एकामागोमाग एक अशा दोन अत्यंत जोखमीच्या बचाव मोहिमा यशस्वी करून आपदा मित्र अभिकेत म्हात्रे आणि राजेश म्हात्रे यांनी प्रसंगावधान, धाडस, प्रशिक्षण आणि सेवाभावाचा आदर्श घालून दिला. या दोन्ही नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलांना वेळेत सुरक्षितस्थळी आणून वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आल्याने माता आणि त्यांच्या गर्भातील बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे बचावकार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

जिल्हा प्रशासनाची तत्परता, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचा प्रभावी समन्वय, रुग्णवाहिकेची सज्जता आणि आपदा मित्रांचे धाडस यामुळे दोन गर्भवती महिलांना वेळेत मदत मिळू शकली. जीवाची जोखीम पत्करून राबविण्यात आलेल्या या बचाव मोहिमेबद्दल रावे आणि तांबडशेत परिसरातील नागरिकांनी शासन, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि धाडसी आपदा मित्रांचे आभार मानले आहेत.

# पालखेड विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांवर बक्षिसांचा वर्षाव; ५३ हजारांच्या रोख पुरस्कारांचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ५३ हजार ४ रुपयांच्या रोख बक्षिसांनी गौरव करण्यात आला. दानशूर श्रावण हिरे यांच्या पुढाकारातून विविध दिवंगत व्यक्तींच्या स्मरणार्थ देण्यात आलेल्या या पुरस्कारांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळाले असून, त्यांच्या या अनोख्या दातृत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी अध्यक्षीय भाषणात श्रावण हिरे म्हणाले की, "अत्यंत कठीण परिस्थितीत मुंबईत दिवसभर मजुरी करत आणि रात्री शाळेत शिक्षण घेत मी माझे शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व मला चांगलेच माहीत आहे. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा माझा छोटासा प्रयत्न आहे."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र




शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे होते. व्यासपीठावर पी. सी. जगताप, विधिज्ञ आर. डब्ल्यू. पारखे, संतोष गायकवाड, मधुकर डावरे, अशोक गांगुर्डे, सागर गांगुर्डे, आनंदा निरभवणे, आशाबाई निळे, रंजना हिरे, डी. एम. थेटे, ज्ञानेश्वर जाधव, सतीश थेटे, विजय आहेर, अशोक आहेर, रवींद्र कोकाटे, कैलास खैरे, विनायक खैरे, ज्ञानेश्वर आहेर तसेच मुख्याध्यापक अशोक शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थिनी अक्षदा जगताप हिला कै. बकुबाई पुंजाजी हिरे यांच्या स्मरणार्थ १५,००१ रुपये, निसर्ग निकम याला कै. पार्वताबाई रामचंद्र गांगुर्डे यांच्या स्मरणार्थ १०,००१ रुपये, वीणा थेटे हिला कै. पुंजाजी गेणुजी हिरे यांच्या स्मरणार्थ १०,००१ रुपये आणि प्रेरणा गांगुर्डे हिला कै. इगलू एन. लंगराना यांच्या स्मरणार्थ १०,००१ रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले.

याशिवाय विशेष प्राविण्य मिळविलेल्या नयना आहेर, साई शेळके, सिद्धेश्वर पवार, साहिल खैरे आणि पूर्वा खैरे यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले. तसेच कै. दिनकरदादा खैरे यांच्या स्मरणार्थ अक्षदा जगताप हिला १,५०० रुपये, वीणा थेटे हिला १,००० रुपये आणि नयना आहेर हिला ५०० रुपयांचे विशेष पारितोषिक देण्यात आले. एकूण ५३,००४ रुपयांच्या रोख बक्षिसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्दवळे, संजय लव्हंगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, ज्ञानेश्वर मातेरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी यांच्यासह शिक्षणप्रेमी, पालक, ग्रामस्थ, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी केले. सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार प्रदर्शन राहुल दवते यांनी केले.

# तळोजात भीषण अपघात, कारने पाच वाहनांना दिली धडक, एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**



**नवीन पनवेल प्रतिनिधी** : तळोजात सात जुलै रोजी दुपारी बाराच्या सुमारास भीषण अपघातात एका कारने पाच वाहनांना धडक दिली. या अपघातात पाच ते सहा जण जखमी झाले असून एकाचा मृत्यू झाला आहे. नदीम खान असे मृत्युमुखी पडलेल्या इसमाचे नाव आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करत आहेत.सात जुलै रोजी दुपारी बाराच्या सुमारास तळोजा फेस वन मध्ये भरधाव वेगाने आलेल्या चार चाकी कारने रिक्षा, टेम्पो आणि तीन मोटरसायकलला धडक दिली. त्यानंतर वडापावच्या गाडीला देखील धडक दिली. यावेळी तेथील तेल अंगावर उडाल्याने काही जण जखमी झाले. रिक्षा, टेम्पो, मोटारसायकल या वाहनांना धडक दिल्याने पाच जण जखमी झाले तर एकाचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्यासह पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावरून कारचालक पळून गेला आहे. अपघातात जखमी झालेल्या एकाची प्रकृती गंभीर आहे. यातील जखमींवर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# वांगी खुर्द शाळा: ४८ विद्यार्थ्यांवर केवळ एक शिक्षक

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वांगी खुर्द (उर्दू) येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. ४८ विद्यार्थी संख्या असलेल्या या शाळेत ४ पदे मंजूर असताना केवळ २ शिक्षक कार्यरत होते. त्यात भर म्हणजे, २ जुलै २०२६ पासून एक महिला शिक्षक ६ महिन्यांच्या प्रसूती रजेवर गेल्याने आता संपूर्ण शाळेचा भार एकाच शिक्षकावर येऊन पडला आहे. एकाच शिक्षकाने

## विजय म्हस्के पाटील यांनी दिले गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

सर्व वर्ग सांभाळणे अशक्य असल्याने विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत आहे.

या गंभीर समस्येवर केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी सिल्लोडचे गटविकास अधिकारी (BDO) यांना दि. ७ जुलै २०२६ रोजी तीव्र निषेधाचे निवेदन सादर केले. प्रशासनाने तात्काळ पर्यायी शिक्षकाची नियुक्ती न केल्यास, शाळा व्यवस्थापन समिती व संतप्त पालकांसह शाळेला कुलूप ठोकून पंचायत समितीसमोर शांततापूर्ण आंदोलन करण्याचा इशारा म्हस्के पाटील यांनी दिला आहे.

यावेळी निवेदनासोबत शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यांचे पत्र जोडण्यात आले असून, प्रशासनाने २४ तासांत निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

# मिडल क्लास' भागात महाकाय होर्डिंगचा भाग कोसळल्यानंतर नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : मुंबईतील घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेची भीषण आठवण ताजी असतानाच, पनवेलमध्येही तशाच प्रकारच्या एका मोठ्या दुर्घटनेची टांगती तलवार नागरिकांच्या डोक्यावर निर्माण झाली आहे. पनवेलमधील महामार्गाला लागून असलेल्या 'मिडल क्लास' परिसरात उभारण्यात आलेल्या एका महाकाय होर्डिंगचा (बिलबोर्ड) एक मोठा भाग थेट खाली रस्त्यावर कोसळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून, आता "हे धोकादायक होर्डिंग तिथून तात्काळ कायमचे काढण्यात यावे," अशी तीव्र मागणी स्थानिक नागरिकांमधून पुढे येत आहे.सध्या पनवेल आणि परिसरात मान्सूनचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुटला आहे. या वादळी हवामानामुळे या




अजस्र होर्डिंगचा सांगाडा कमकुवत झाला आणि त्याचा एक मोठा भाग थेट खाली रस्त्याच्या कडेला येऊन पडला. सुदैवाने, तो

## "ते होर्डिंग तिथून तात्काळ काढा", नागरिकांची आक्रमक मागणी!

भाग कोसळला त्या क्षणी तेथून कोणीही जात नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, हा मिडल क्लास परिसर संपूर्णपणे रहिवासी असून येथे नागरिकांची आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा गजबजलेल्या भागात आणि महामार्गालगत उभे असलेले हे एवढे मोठे होर्डिंग निष्पाप नागरिकांच्या जीवावर उठले आहे. होर्डिंगचा एक भाग आधीच निखळून खाली पडल्याने, संपूर्ण होर्डिंगच कमकुवत झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यातच सातत्याने येणारे पावसाचे सुसाट्याचे झोत आणि वेगवान वारा यामुळे हे संपूर्ण महाकाय होर्डिंग कधीही पत्त्यासारखे कोसळू शकते, अशी थेट भीती येथील मिडल क्लास परिसरातील रहिवाशांना सतावत आहे.

"रात्री-अपरात्री वादळ आणि पाऊस सुरू झाला की घरात बसूनही जीव मुठीत धरून राहावे लागते. केवळ दुरुस्ती करून भागणार नाही, तर हे संपूर्ण होर्डिंगच इथून हटवले पाहिजे," अशी आक्रमक भूमिका येथील भयभीत नागरिकांनी घेतली आहे. एकीकडे अनधिकृत आणि धोकादायक होर्डिंगवर कारवाई करण्याचे दावे पालिकेकडून केले जात असताना, महामार्गालगत आणि थेट मिडल क्लास रहिवासी भागाच्या तोंडावर उभे असलेले हे 'यमदूत' प्रशासनाला का दिसत नाहीत? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. एखादी मोठी दुर्घटना घडून कोणाचा जीव जाण्याची वाट संबंधित यंत्रणा पाहत आहे का?

# वावेघर ग्रुप ग्रामपंचायतीत विकासाला नवी दिशा; उपसरपंचपदी रवी राठोड यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी** : वावेघर ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी श्री. रवी राठोड यांची निवड झाल्याने ग्रामपंचायतीच्या विकासकामांना नवी गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीबद्दल ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.ग्रामपंचायतीच्या विकासात्मक कामांना प्राधान्य देत पाणीपुरवठा, गटार सफाई, ग्रामपंचायत कार्यालयाची उभारणी, ग्रामनिधीचा विकासकामांसाठी प्रभावी वापर, अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच मान्सूनपूर्व तयारी यांसारख्या जनहिताच्या विषयांवर अधिक वेगाने काम



होईल, अशी अपेक्षा सदस्यांनी व्यक्त केली. ग्रामपंचायतीच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये सर्व सदस्यांचा सहभाग राहावा, परस्पर समन्वय वाढावा आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून ग्रामस्थांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका सदस्यांनी स्पष्ट केली.

"गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेले सर्व निर्णय पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने घेतले जातील. मूलभूत सुविधांबाबत प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्व सदस्य एकत्रितपणे कार्य करतील," असा विश्वास ग्रामपंचायत सदस्यांनी व्यक्त केला.उपसरपंच श्री. रवी राठोड यांच्या नेतृत्वाखाली वावेघर, दापिवली आणि संपूर्ण ग्रुप ग्रामपंचायतीच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## जाहिर नोटिस

नमुना एन डी

(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. 1643/PNL/90 समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BD7573 चे मालक कै.प्रभाकर दगडू आंग्रे याचं दिनांक 13/06/2025 रोजी निधन झाले आहे.

मी

सुनंदा प्रभाकर आंग्रे

उमरोली, पोस्ट -वाजे,ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**सुनंदा प्रभाकर आंग्रे**
**उमरोली, पोस्ट -वाजे,**
**ता-पनवेल,**
**रायगड,महाराष्ट्र,410206.**

## जाहिर नोटिस

नमुना एन डी

(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH/46/CC/AUTO/2018/4522 समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46AZ5061 चे मालक कै.पिंटू राजाराम खाडेकर याचं दिनांक 03/10/2024 रोजी निधन झाले आहे.

मी

प्रिया पिंटू खाडेकर.

वलप, रूम नं -161,ऑप्प हनुमान मंडी, पो -पडघे,ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**प्रिया पिंटू खाडेकर**
**वलप, रूम नं-161,ऑप्प हनुमान मंडी, पो -पडघे,ता-पनवेल,**
**रायगड,महाराष्ट्र,410206.**

# शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका : ना. नितीन गडकरी

## ना. विजेंदर गुप्ता,भाजपचे प्रवक्ते खा. डॉ. त्रिवेदी यांच्या हस्ते माजी आ. भीमराव धोंडे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे** : शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका, सरकार मका, बांबु पासुन इथेनॉल निर्मिती करीत आहे, अशी उत्पादने घ्यावीत. तसेच सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रोजगार निर्मितीसाठी प्रयत्नशील आहे असे प्रतिपादन केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांनी दिल्ली येथील हॉटेल हयात रिजनसी येथे झालेल्या भव्यदिव्य कार्यक्रमात केले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना नवभारत मिडीया ग्रुपच्या वतीने महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले याप्रसंगी ना. गडकरी बोलत होते. यावेळी भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया, सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. श्रीमती अनुप्रिया पटेल,केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण ( आयुष्य ) राज्यमंत्री स्वतंत्र कारभार ना. प्रतापराव जाधव, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री ना. हरदिपसिंग पुरी, दिल्ली विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता,भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा.डॉ. सुधांशू त्रिवेदी, माजी मंत्री स्मृती इराणी उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, शैक्षणिक, राजकीय, कृषी, सामाजिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नवभारत मिडीया ग्रुपच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र गौरव पुरस्कार माजी आ. भीमराव धोंडे यांना दिल्ली येथे, दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष ना. विजेंदर गुप्ता,भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा. डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, याप्रसंगी सौ. दमयंतीताई धोंडे, अभयराजे धोंडे व इतर उपस्थितीत होते. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी गेल्या ४५ वर्षात मतदारसंघाचा मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक व इतर विकास केला आहे. त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी नवभारत मिडीया ग्रुपच्या वतीने " कॉफी टेबल बुक "अंतर्गत केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री ना. नितीन



गडकरी,भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया, सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. श्रीमती अनुप्रिया पटेल,केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण ( आयुष्य ) राज्यमंत्री स्वतंत्र कारभार ना. प्रतापराव जाधव, दिल्ली विधानसभा अध्यक्ष ना. विजेंदर गुप्ता,भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा. डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या नवभारत ग्रुपच्या वतीने मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीत केंद्रीय रस्ता वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांनी सांगितले की, मी १९९५ मध्ये महाराष्ट्रात मंत्री झाल्यावर मला अगदी शेवटच्या टप्प्यात रॉकी हिलमध्ये निवासस्थान मिळाले होते. त्याठिकाणी साधा टिव्ही सुध्दा नव्हता. महाराष्ट्रात मंत्री असताना माझ्या खात्याला फक्त २३०० कोटी रुपये निधी उपलब्ध होता. तो कसा आणि कोठे वापर करायचा असा प्रश्न होता. पण आज माझ्या खात्याकडे १५ लाख करोड रुपयांचे नियोजन आहे, आजपर्यंत अनेक हायवे बनवले असुन काश्मीर ते कन्याकुमारी असे रस्ते बनवायचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील शेतकऱ्यांना एक नंबर बनण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. सरकार मका, बांबु पासुन इथेनॉल बनवत आहे. शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रोजगार निर्माण होण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. वाढते प्रदुषण कमी करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. यावेळी ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते महिलांच्या शिक्षणाचे प्रणेते महात्मा फुले यांच्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. मला जे मिळाले त्यात मी समाधानी आहे. भविष्याची मला चिंता नाही असेही त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया यांनी सांगितले की, २०४७ च्या भारताच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण ( आयुष्य ) राज्यमंत्री स्वतंत्र कारभार ना. प्रतापराव जाधव यांनी सांगितले की,लवकरच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ५० बेडचे आयुष्य हॉस्पिटल होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात की, देशातील लोकांना चांगले आरोग्य द्यायचे आहे, प्रत्येक व्यक्ती निरोगी राहण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री ना. श्रीमती अनुप्रिया पटेल यांनी सांगितले की, समाजात वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्याचा नवभारत ग्रुप सन्मान करीत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे योगदान देशाच्या विकासासाठी महत्वाचे आहे. आज प्रत्येक व्यक्तीची लाईफस्टाईल बदलत चालली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. निरोगी जीवन जगण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने संतुलित व सकस आहार घ्यावा.

सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर यांनी सांगितले की, पालकांनी मुलींना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करावे. सोशल मिडिया मुळे लहान मुले बिघडत आहेत त्यामुळे सोशल मिडियावर काही प्रमाणात निर्बंध आले पाहिजेत. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा.डॉ. सुधांशू त्रिवेदी, दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष ना. विजेंदर गुप्ता व इतरांचेही भाषणे झाली.

यावेळी नवभारतच्या पत्रकार माधवी वाडकर यांनी माजी आ. भीमराव धोंडे यांची मुलाखत घेतली. नवभारत ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर निमिश माहेश्वरी, नवभारत ग्रुप समुहाचे अध्यक्ष ए. श्रीनिवास, नवभारतचे संचालक वैभव माहेश्वरी, निवासी संपादक संजय तिवारी, सरव्यवस्थापक कल्याण पांडे, बीड जिल्हा प्रतिनिधी रवि उबाळे व इतरांनी महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्राप्त माजी आमदार भीमराव धोंडे व सौ. दमयंतीताई धोंडे, अभयराजे धोंडे यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन आनंद सिंग यांनी केले. यावेळी पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाय, प्रा. राजू पाचे, पत्रकार दिगंबर बोडखे, प्रा. जफर शेख, संभाजी वनवे, प्रा. राहुल निकाळजे व इतर उपस्थित होते. देशपातळीवर मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी आमदार भीमराव धोंडे यांचे बीड जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

# रहिमाबाद शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी नागेश राऊत

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : रहिमाबाद (ता. सिल्लोड) येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी नागेश राऊत, तर उपाध्यक्षपदी रामेश्वर सिरसाठ यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. सोमवारी (ता. ६) आयोजित विशेष सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली.



यावेळी सचिवपदी मुख्याध्यापक शालिकराम राऊत यांची निवड करण्यात आली. समितीच्या सदस्यपदी रामदास शिंदे, अशोक गाढवे, प्रल्हाद भुते, ज्योती विष्णू जाधव, गोकुळाबाई रामदास भोकरे, उषाताई योगेश मोरे, पुष्पाताई समाधान मोरे, तर शिक्षक सदस्य म्हणून गणपत साळवे यांची निवड झाली आहे.

निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरपंच सुभाष नवल, बाजार समिती संचालक जयराम चिंचपुरे, माजी सरपंच अंकुश पाटील, विलास शिंदे, उपसरपंच डॉ. सुनील खराडे, शिवसेना संघटक संजय डमाळे, पोलीस

**उपाध्यक्षपदी रामेश्वर सिरसाठ यांची बिनविरोध निवड; ग्रामस्थांकडून अभिनंदन**

पाटील विलासराव चिंचपुरे, भिकन राऊत, सुनील भोकरे, मावळते अध्यक्ष अमोल तोंगल, राजू नवल, लक्ष्मण राऊत, संजय पाटील, संजीव तोंगल, अशोक शिंदे, योगेश तोंगल, सुनील मिरगे, कमलाकर तोंगल, दत्ता मोरे, प्रदीप चिंचपुरे, सोनाजी सिरसाठ यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# स्कॉलरशिप परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त 'रा.जि.प.शाळा नवीन शेवे' ची विद्यार्थिनी संस्कृती करांडे उरण तालुक्यात १४ वी!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : राजिप शाळा नवीन शेवे (ता. उरण, जि. रायगड) या शाळेची गुणवंत विद्यार्थिनी कुमारी संस्कृती सुरेश करांडे हिने पाचवी इयत्तेत घेतल्या जाणाऱ्या स्कॉलरशिप परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या स्कॉलरशिप परीक्षेच्या निकालात संस्कृती उत्तीर्ण झाली असून, तिने उरण तालुक्यात १४ वा क्रमांक पटकावून ती शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




संस्कृतीच्या या घवघवीत यशामुळे शाळेच्या मुख्याध्यापिका मोहिनी पाटील मॅडम, शेवे केंद्राचा कार्यभार सांभाळणारे पदवीधर शिक्षक म का म्हात्रे सर, शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ आणि संपूर्ण शेवे शाळेतर्फे तिचे जाहीर अभिनंदन करण्यात आले.या परीक्षेसाठी संस्कृतीला तिच्या वर्गशिक्षिका चैताली राकेश म्हात्रे यांनी अत्यंत मोलाचे व मार्गदर्शक ठरेल असे योगदान दिले. त्याचप्रमाणे शाळेतील इतर सर्व शिक्षक वृंदांनीही तिला वेळोवेळी उत्तम मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. संस्कृतीच्या या यशात तिच्या पालकांनी घेतलेले अपार कष्ट आणि दिलेल्या पाठिंब्याचा मोठा वाटा असून, तिच्या या यशाबद्दल पालकांचेही विशेष कौतुक केले जात आहे. शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि संस्कृतीची अफाट मेहनत यांच्या जोरावर तिने तालुक्याच्या गुणवत्तेत स्थान मिळवले आहे. संस्कृतीच्या या यशाबद्दल तिचे, तिच्या मार्गदर्शक शिक्षकांचे आणि पालकांचे उरण तालुक्यातून अभिनंदन होत असून तिच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# लाखनी नगरपंचायतीच्या उपाध्यक्षानंतर अध्याक्षांवरही अविश्वास पारित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : स्थानिक नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष त्रिवेणी मनोज पोहरकर व उपाध्यक्ष लता रमेश रोडे यांचेवर १३ नगरसेवकांनी अविश्वास प्रस्ताव १ जुलै रोजी जिल्हाधिकारी भंडारा व नगराध्यक्ष यांचेकडे दाखल केला होता. त्या संदर्भात आज मंगळवारी (ता. ७ ) ला विशेष सभेचे आयोजन अध्यासी अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी स्वाती देसाई यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. त्यामध्ये अध्यक्ष यांच्या विरुद्ध १४ नगरसेवकांनी मतदान केले तर अध्यक्ष यांच्या बाजूने एकही नगरसेवकांनी पाठींबा दर्शविला नाही . १४ विरुद्ध ० मतांनी अविश्वास ठराव पारित झाला.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून १७ सदस्यीय लाखनी नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर २०२१ व जानेवारी २०२२ अशा दोन टप्प्यात पार पडली होती. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ८,भाजपा ६,काँग्रेस २ व अपक्ष १ असे एकुण १७ नगरसेवक निवडून आले होते.



नगराध्यक्षपद अनुसूचित जाती(महिला) साठी आरक्षित असल्याने नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या त्रिवेणी पोहरकर यांची नगराध्यपदी वर्णी लागली होती. तर उपाध्यक्ष प्रदीप तितीरमारे यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर भाजपच्या लता रोडे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली होती.

**अविश्वास पारित नंतर पत्रकार परिषद**

लाखनी नगरपंचायतीच्या १३ नगरसेवकांनी दाखल केलेल्या अविश्वास पारित झाल्यानंतर १४ ही नगरसेवकांनी पत्रकार परिषद घेत आपली कैफियत मांडली. अध्यक्षांचा पतीचा व उप्ध्याक्षांचा मुलाचा नगरपंचायत प्रशासनात हस्तक्षेप होत असल्याचे सांगितले. आता सर्व पक्षीय नगरसेवक एकत्र येवून लाखनी शहराचा विकास करणार असल्याची माहिती दिली.

# आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त सणसरमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : लोकनेते आदरणीय बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त सणसर (ता. इंदापूर) येथे विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.प्रहार जनशक्ती पक्षाचे राज्याध्यक्ष धर्मेंद्र सातव पाटील,जिल्हाध्यक्ष शरद जाधव आणि महिला जिल्हाध्यक्ष सुप्रिया ताई लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पेन तसेच इतर आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगत नियमित अभ्यास, शिस्त आणि जिद्दीच्या





बळावर उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालक व ग्रामस्थांनी या सामाजिक उपक्रमाचे स्वागत केले.

कार्यक्रमास अन्न व औषध महाराष्ट्र राज्य आयोगाचे सदस्य ॲड.रणजितभैय्या निंबाळकर,माजी आदर्श सरपंच पै.पांडुरंग निंबाळकर विद्यमान सरपंच यशवंत नरुटे पाटील,माजी सरपंच विजय (आबा) निंबाळकर,पार्थ निंबाळकर,राहुल काळे,सामाजिक कार्यकर्ते मोहन सुरवडकर,सणसर सोसायटीचे संचालक सोमनाथ (पिंटू) गुप्ते,तंटामुक्तीचे अध्यक्ष महेश निंबाळकर,जाचकवस्तीचे ग्रामसेवक संदीप सोडमिसे,भागवत(आण्णा ) निंबाळकर,सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ जाधव अंकुश जोगदंड,तसेच प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले,इंदापूर तालुकाध्यक्ष अनंतराव गायकवाड, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब जामदार,तालुका सचिव रामदास चव्हाण,तालुका सोशल मीडिया अध्यक्ष ज्ञानदेव कांबळे,तालुका कोषाध्यक्ष पोपट दराडे, तालुका संघटन प्रमुख महेश्वर जगताप, तालुका सहखजिनदार ईनुस शेख,तालुका महिला अध्यक्ष सुक्षला ढाणे,तालुका महिला उपाध्यक्षा रुपाली जगताप,सदस्य शोकद शेख,राजेंद्र कांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते,शिक्षक, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी अशा समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा भविष्यातही कायम ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# जिल्हा परिषदेत खासदार राजेंद्र जैन यांच्या उपस्थितीत आढावा बैठक; स्थानिक प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : आज गोंदिया जिल्हा परिषदेत महत्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय घडामोडी पाहायला मिळाल्या. जिल्हा परिषद उपाध्यक्षांच्या दालनात राज्यसभा खासदार श्री. राजेंद्र जैन यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत जिल्ह्याच्या प्रगतीसंदर्भात सविस्तर आणि सकारात्मक चर्चा केली.



**विकासकामांवर आणि प्रलंबित विषयांवर मंथन**

या बैठकीत गोंदिया जिल्ह्यातील विविध विकासकामे, बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेले विषय, जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असणारे प्रकल्प आणि स्थानिक नागरिकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी उपस्थितांनी खासदार श्री. राजेंद्र जैन यांचे 'वृक्ष' (रोपटे) भेट देऊन पर्यावरणपूरक स्वागत केले व त्यांचा यथोचित सत्कार केला.

**यांची लाभली प्रमुख उपस्थिती**

या महत्वपूर्ण बैठकीला जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे, केतन तुरकर, अखिलेश सेठ, केवळ बघेले, रवी पटले, करण टेकाम, राजू ठाकरे, पंकज चौधरी, सुरेंद्र रहंगडाले, रघुपती अगडे, सुनील पटले, शैलेश वासनिक, घनेश्वर तिरेले, हितेश पतेह, भूपेश गौतम सहित जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या वसतिगृहातील सुरक्षेतील त्रुटींची चौकशी करून कडक कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सेलू/प्रतिनिधी शिवाजी पवार** : सेलू येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या वसतिगृहातील सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटींची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी तातडीने आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने तहसीलदार, सेलू यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या वसतिगृहात राहणारी इयत्ता सहावीतील राधे धामणगाव येथील एक अल्पवयीन विद्यार्थिनी नुकतीच कोणालाही न सांगता वसतिगृहातून बाहेर पडली. संबंधित विद्यार्थिनी बसस्थानक परिसरातील एका दुकानाजवळ आढळून आली. दरम्यान, विद्यार्थिनीने काही व्यक्तींनी आईचे निधन झाल्याचे सांगून तिला बसस्थानक परिसरात नेल्याचा दावा केला. मात्र, विद्यालय प्रशासनाने हा प्रकार बनाव असल्याचे सांगितले असले तरी, या घटनेमुळे वसतिगृहाच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सुदैवाने जागरूक नागरिकांच्या सतर्कतेमुळे पुढील अनर्थ टळला.




मात्र, एवढ्या लहान वयाची विद्यार्थिनी वसतिगृहातून बाहेर पडते आणि याची प्रशासनाला वेळेवर माहितीही होत नाही, ही बाब अत्यंत गंभीर असून संबंधित यंत्रणेच्या हलगर्जीपणाचे द्योतक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ग्रामीण व वंचित घटकातील मुलींच्या सुरक्षिततेच्या विश्वासावर पालक आपल्या पाल्यांना या वसतिगृहात ठेवतात. त्यामुळे अशा घटना पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठानने काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. घटनेच्या वेळी कर्तव्यावर असलेल्या गृहपाल, सुरक्षा रक्षक व संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीने चौकशी करून कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

वसतिगृहाच्या प्रवेश-निर्गमन व्यवस्थेची तपासणी करून २४ तास सक्षम सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात यावी. वसतिगृह परिसर व मुख्य प्रवेशद्वारावर उच्च क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्यांचे नियमित निरीक्षण करण्यात यावे. संबंधित विद्यार्थिनीने हे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले, याची मानसोपचार तज्ज्ञांमार्फत चौकशी करून तिला आवश्यक मानसिक आधार देण्यात यावा. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विद्यार्थिनींच्या उपस्थिती व हालचालींवर प्रभावी नियंत्रण ठेवणारी कडक यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून, याप्रकरणी तातडीने ठोस उपाययोजना करून दोषींवर कारवाई करण्यात यावी. अन्यथा पालक व श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी जयसिंग शेळके, रवि लांडगे, विनोद धापसे, गणेश शेवाळे, भागवत बालटकर, संदीप पाजगे आणि योगेश राऊत उपस्थित होते.

## भाजपा ओबीसी नांदेड जिल्हा सरचिटणीस पदी गजानन श्रीरामवार यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर** ; उमरी येथील भारतीय जनता पार्टीचे जुने व निष्ठावंत कार्यकर्ते तथा उमरी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक ओबीसी नेते श्री गजानन तानाजीराव श्रीरामवार यांचे भाजपा पक्षासाठी राजकीय कार्य लक्षात घेऊन व पुर्वीच्या कामाची दखल घेत भारतीय जनता पार्टी वरिष्ठांच्या आदेशान्वये ओबीसी नांदेड जिल्हाध्यक्ष मा.श्री उत्तम पुनाजी चव्हाण साहेब यांच्या



पत्रा अन्वये नियुक्ती पत्र देत श्री गजानन तानाजीराव श्रीरामवार यांची भाजपा ओबीसी नांदेड जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीरामवार यांच्या निवडीचे सर्व राजकीय, सामाजिक, व्यापारी स्तरातून अभिनंदन करत पुढील वाट चालीस शुभेच्छा देण्यात आले या वेळी उपस्थित विष्णु अट्टल, गोविंद अट्टल, नरसिंग मुक्कावार, अशोक मामीडवार, पत्रकार चव्हाण, शिवाजी पा. शिंदे , संभाजी सावंत, अनिल सावकार नगनूरवार, शिवाजी पाटील,गणेश पगलवाड, पांडुरंग पा.वडजे आदी अनेक जण या वेळी उपस्थित होते.

## सिल्लोडमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उत्साहात स्वागत

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : मोढा खुर्द (ता. सिल्लोड) येथे उभारण्यात येणाऱ्या हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचे सिल्लोड शहरात आगमन होताच, माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात



आले.यावेळी उपस्थित शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी "छत्रपती शिवाजी महाराज की जय" च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, न्यायप्रियता आणि स्वराज्याची प्रेरणा भावी पिढ्यांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने मोढा खुर्द येथे उभारण्यात येणारा हा अश्वारूढ पुतळा परिसरासाठी प्रेरणास्थान ठरणार असल्याची भावना उपस्थित शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, नगरसेवक सिद्धेश्वर आहेर, नॅशनल सहकारी सूत गिरणीचे संचालक शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, शेख सलीम हुसेन, प्रशांत क्षीरसागर, गणेश पाटील, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद शेख जहिर, जगन्नाथ कुदळ, युवासेनेचे शिवा टोम्पे, संदीप हाडोळे, फहिम पठाण, महेश पाटील, स्वप्नील शेळके, रत्नाकर बडक आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोयगावातील जीवघेणे खड्डे ठरत आहेत मृत्यूचा सापळा; नागरिकांचा संताप अनावर!"

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव-चाळीसगाव मार्गावरील आगार व्यवस्थापकांच्या निवासस्थानासमोरील भला मोठा खड्डा नागरिकांच्या जीवावर उठला असून संबंधित प्रशासन मात्र अद्यापही ढिम्म असल्याचे चित्र आहे.मंगळवारी साप्ताहिक बाजाराच्या दिवशी याच खड्ड्यामुळे दोन वाहनधारकांना अपघाताला सामोरे जावे लागले. त्यांना किरकोळ दुखापत झाली असली तरी मोठी जीवितहानी टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांची खोली



वाहनचालकांना दिसत नाही. रात्रीच्या वेळी तर हा रस्ता मृत्यूचा सापळाच ठरत असून, कोणत्याही क्षणी भीषण अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.अनेक वेळा या धोकादायक परिस्थितीकडे लक्ष वेधूनही संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.केवळ हा एकच खड्डा नव्हे, तर सोयगाव-आमखेडा मार्गावरील सोना नदीच्या पुलावरही मोठमोठे खड्डे पडले आहेत. या मार्गावर दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते.तरीही रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याने रोजच अपघात घडत आहेत.एखाद्याचा निष्पाप जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का,असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे वाहनांचे नुकसान, नागरिकांचा आर्थिक भुर्दंड आणि जीविताचा वाढता धोका याची जबाबदारी नेमकी कोण घेणार, असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या जीवघेण्या खड्ड्यांची दुरुस्ती करून रस्ते सुरक्षित करावेत, अन्यथा भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## दर्यापूरात प्रतिबंधित गुटखा साठ्यावर पोलिसांची धाड; १४ हजार ४०९ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर शहरातील कारसदपुरा परिसरात प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व गुटख्याचा अवैध साठा करून विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती दर्यापूर पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी धाड टाकून एका आरोपीस अटक केली. या कारवाईत एकूण १४ हजार ४०९ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

पोलिसांनी मोहम्मद इझान मोहम्मद अहमद (वय २६, रा. कारसदपुरा, दर्यापूर) यांच्या घरावर छापा टाकला. झडतीदरम्यान मस्तानी तंबाखू, बाजीराव गोल्ड पान मसाला,



एच-फाईव्ह तंबाखू, विमल पान मसाला, वाह पान मसाला, डब्ल्यू तंबाखू, डी-वन तंबाखू, हॉट प्रीमियम पान मसाला, पानपराग तसेच प्रीमियम नजर आदी विविध कंपन्यांचे प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचे पॅकेट आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या सर्व मुद्देमालाची किंमत १४ हजार ४०९ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दोन पंचांच्या उपस्थितीत जप्ती पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली. या प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके अधिनियमाच्या कलम ५९ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २२३, २७३, २७५ आणि १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत अजित राठोड, दांडे, कडू, लखन, निखिल आणि आशीष यांनी सहभाग घेतला.

**गुटखा विक्रेत्यांवर पोलिसांची करडी नजर**

दर्यापूर शहरात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम सुरू ठेवली असून, अशा बेकायदेशीर व्यवसायावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

## ज्ञानप्रवासाची मंगल सुरुवात व नव्या स्वप्नांची नवी वाट

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी सचिन ठाकूर धामणगाव रेल्वे** : एस. ओ. एस. कब्स* मध्ये आज नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि उत्साहवर्धक ठरला. शाळेत विद्यार्थ्यांचे फुले, टाळयांचा गजर आणि आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडला. *मुख्याध्यापिका ,प्रि. प्रायमरी हेड* आणि शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांचे कुमकुम टिळक करून स्वागत केले विद्यार्थ्यांना शिक्षिकानी हाताने बनविलेल्या भेटवस्तू देण्यात आल्या त्यांच्या आठवणी स्मरणात राहील यासाठी सुंदर असे सेल्फी पॉइंट तयार करण्यात आले

**एस. ओ. एस. कब्स बुधवार बाजार रोड धामणगाव ( रेल्वे) येथे विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठया उत्साहात साजरा**

होते तसेच शाळेचा परिसर सुंदर सजविण्यात आला होता. मुख्य प्रवेशद्वारावर फुग्यांची सजावट करण्यात आली होती. *मुख्याध्यापिका मा. प्रचिति धर्माधिकारी आणि प्री प्रायमरी हेड मा.शबाना खान** यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता *प्रणिता जोशी,रेणुका सबाने, वर्षा देशमुख, आकांक्षा महल्ले, अश्विनी नांदणे,विशाखा मेंढे, स्नेहल दुर्गे, रूचा अलवाडकर, साक्षी ठाकरे, प्रिया गुप्ता यांनी सहकार्य केले...

## आ. बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त प्रहार दिव्यांग संघटनेचे दत्तात्रय कदम यांचा समाजोपयोगी उपक्रम; सौंदाना येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : आमदार बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त प्रहार दिव्यांग संघटनेचे पाटोदा तालुकाध्यक्ष दत्तात्रय कदम यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सौंदाना येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधत समाजोपयोगी उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.या प्रसंगी विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल तसेच इतर आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये




आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक हरिभाऊ नाईकनवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिवराज कदम, नारायण कदम, शिवदास आगुंडे, महादेव कदम, दत्ता कदम, बालाजी कदम, ईश्वर कदम आणि सचिन कदम उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी प्रहार दिव्यांग संघटनेचे पाटोदा तालुकाध्यक्ष दत्तात्रय कदम यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या समाजोपयोगी उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली असून समाजात सकारात्मक संदेशही पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## वाढदिवसानिमित्त गरजू कुटुंबांना वस्त्रवाटप; राजकुमार भगत यांचा समाजापुढे आदर्श

**दैनिक युवक आधार**
**राजु प्रकाशराव गायकवाड** : वाढदिवसाच्या औचित्याने सामाजिक बांधिलकी जपत राजकुमार भगत यांनी पालावर राहणाऱ्या गरजू कुटुंबांना कपड्यांचे वाटप केले. समाजातील वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमामध्ये पुरुष, महिला व लहान मुलांसाठी उपयोगी कपड्यांचे वितरण करण्यात आले. वस्त्रवाटपामुळे अनेक गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला. वाढदिवसाचा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याच्या निर्णयाचे उपस्थित नागरिकांनी विशेष कौतुक केले.




> "वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी करण्याची संधी आहे. गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य फुलवता आले, तर त्यापेक्षा मोठी भेट दुसरी कोणतीच नाही."
> राजकुमार भगत

राजकुमार भगत हे स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था,बेलोरा तसेच आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हाध्यक्ष, यवतमाळ म्हणून कार्यरत असून विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत असतात. त्यांच्या या उपक्रमातून समाजसेवेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

उपस्थित नागरिकांनी अशा प्रकारचे उपक्रम समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत व्यक्त केले. वाढदिवस साजरा करण्याची ही समाजाभिमुख पद्धत इतरांसाठीही अनुकरणीय असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# कलगाव - गुंज रस्ता त्वरीत दुरुस्त करा तहसीलदारांना निवेदन, आठ दिवसांत तीव्र आंदोलन करणार



**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव,: यवतमाळ** : तालुक्यातील कलगाव- गुंज रस्ता तातडीनेनूतनीकरणासाठी सवना येथील सर्वग्रामस्थांनी तहसीलदार यांना निवेदनदिले. गेल्या दहा वर्षांपासून यारस्त्याची मोठी दुरवस्था झाल्यामुळेवाहनचालकांना जीव धोक्यातघालून प्रवास करावा लागत आहे.रस्ता दुरुस्तीचे काम पुढील आठ दिवसांत सुरू न झाल्यास तीव्र बेमुदतचक्काजाम आंदोलन करण्याचा गंभीरइशारा देण्यात आला.या मुख्य मार्गावरील खड्डड्यांमुळेशालेय विद्यार्थी, स्थानिक शेतकरीआणि गंभीर रुग्णांना मोठा त्राससहन करावा लागत आहे. प्रशासनानेनेहमी केवळ तात्पुरती डागडुजीकेल्यामुळे या परिसरातील संतप्तझालेल्या नागरिकांनीतीव्र नाराजी व्यक्तकेली आहे.

निवेदनदेताना किसानआघाडीमहागावतालुका अध्यक्षप्रमोद जाधव, आबासाहेब देशमुख,गोविंदराव देशमुख व आकाश सोळंकेउपस्थित होते. त्यांच्यासोबत गुंज,कलगाव, वेणी आणि वाकोडी येथीलसमस्त ग्रामस्थ प्रशासनाला हा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यासाठी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# नाशिकची सुवर्णकन्या श्रावणी सांगळे आशियाई अंडर-२३ ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी चीनला रवाना!

## (४०० मीटर अडथळा शर्यत आणि रिले प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणार)

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : नाशिकच्या क्रीडा क्षेत्रातून पुन्हा एकदा एक अत्यंत अभिमानास्पद आणि कौतुकास्पद बातमी समोर आली आहे. येथील 'व्हि.डि.के स्पोर्ट्स फाउंडेशन'ची आंतरराष्ट्रीय धावपटू श्रावणी सांगळे हिची चीनमधील ऑर्डोस येथे होणाऱ्या १ ल्या आशियाई अंडर-२३ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी भारतीय संघात अधिकृत निवड झाली आहे. या ऐतिहासिक स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी श्रावणी आज चीनकडे रवाना झाली.

ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाने (AFI) घोषित केलेल्या ५४ सदस्यीय बलाढ्य भारतीय संघात श्रावणीने आपल्या सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर स्थान निश्चित




केले आहे. ही स्पर्धा चीनमधील ऑर्डोस येथे ९ ते १२ जुलै २०२६ दरम्यान पार पडणार आहे. या स्पर्धेत श्रावणी मुख्यत्वे तीन क्रीडा प्रकारांमध्ये भारताचे आव्हान सादर करेल:

४०० मीटर अडथळा शर्यत (Hurdles)

४०० मीटर मिक्स रिले

४×४०० मीटर महिला रिले

**पूर्वीची सुवर्ण कामगिरी**

श्रावणीने यापूर्वीही आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या गतीची चुणूक दाखवली आहे. २०२४ मध्ये चेन्नई येथे झालेल्या चौथ्या दक्षिण आशियाई ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये तिने सुवर्णपदक पटकावून देशाची मान उंचावली होती. तोच फॉर्म ती या आशियाई स्पर्धेतही कायम ठेवण्यास सज्ज झाली आहे.

**प्रशिक्षक वैजनाथ काळे यांचे खडतर मार्गदर्शन**

श्रावणी सांगळे गेल्या अनेक वर्षांपासून नाशिकमध्ये भारतीय ॲथलेटिक्स प्रशिक्षक वैजनाथ काळे यांच्या कठोर आणि शास्त्रशुद्ध मार्गदर्शनाखाली ॲथलेटिक्सचे खडतर प्रशिक्षण घेत आहे. तिच्या या यशात प्रशिक्षक काळे यांचे मोलाचे योगदान आणि सहकार्य लाभले आहे

"श्रावणीने या स्पर्धेसाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. चीनच्या ट्रॅकवर ती सर्वोत्तम कामगिरी करत पदकांची 'हॅट्ट्रिक' करेल आणि भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावेल, असा आम्हा सर्वांना दृढ विश्वास आहे."

- वैजनाथ काळे, (भारतीय ॲथलेटिक्स प्रशिक्षक)

**नाशिकमधून शुभेच्छांचा वर्षाव**

श्रावणीच्या या आंतरराष्ट्रीय निवडीबद्दल नाशिक जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन, महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, मित्र विहार, अशोका युनिव्हर्सल स्कूलचा माजी विद्यार्थी संघ आणि नाशिकमधील समस्त क्रीडाप्रेमींकडून तिच्यावर कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सभागृहात आवाज उठवा, अन्यथा राजीनामा द्या!" – लिंबागणेश येथे बॅनरबाजी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - राज्यात सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफी, २०२५ चार पिकविमा, घोषित थकीत अनुदान, विविध प्रलंबित प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी सभागृहात प्रभावीपणे आवाज उठवावा, अन्यथा राजीनामा द्यावा, अशी मागणी करणारी बॅनरबाजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे करण्यात आली. अखिल भारतीय किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.अजय बुरांडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत लिंबागणेश येथील मुख्य प्रवेशद्वारावर तसेच प्रमुख चौकांमध्ये बॅनर लावण्यात आले आहेत. या बॅनरवर "सरसकट कर्जमाफी, २०२५ चा पिकविमा, घोषित शेतकरी




> शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या
>
> - २०२५ चा पिकविमा तातडीने मंजूर करून वितरित करावा.
> - शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती जाहीर करावी.
> - घोषित शेतकरी अनुदान तत्काळ वितरित करावे.
> - प्रलंबित शेतीविषयक प्रश्नांवर अधिवेशनात प्रभावी चर्चा करून निर्णय घ्यावेत.

अनुदान व इतर शेती प्रश्नांवर सभागृहात प्रश्न मांडणार नसाल तर राजीनामा द्या" असा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला. या वेळी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले की, २०२५ चा पिकविमा, सरसकट कर्जमुक्ती, घोषित शेतकरी अनुदान तसेच इतर शेतीविषयक प्रलंबित प्रश्नांवर बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी विधानसभेत व विधान परिषदेत ठोस भूमिका घेत शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रभावी आवाज उठवणे आवश्यक आहे. अन्यथा शेतकऱ्यांचा विश्वास गमावलेल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा. या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे, सेवा सोसायटी चेअरमन रविबापु निर्मळ, माजी सरपंच शंकर वाणी, बाळकृष्ण थोरात, विक्की वाणी, सय्यद अख्तर, महावीर वाणी, अक्षय आबदार, दादा गायकवाड, भगवान मोरे, तुळशीराम वनवे, गणपत तागड, रत्नाकर वाणी, रामदास मुळे, संतोष भोसले, संभाजी वाणी, तानाजी वाणी, बबन तागड, रामदास वाणी, माऊली कुदळे, नामदेव आवसरे, सिताराम थोरात सह आदी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत लोकप्रतिनिधींनी तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

# दिघीच्या वेदांत नागवेकरची राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दमदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दिघी गावचा सुपुत्र आणि सध्या मुंबईतील चांदिवली (अंधेरी परिसर) येथे वास्तव्यास असलेला युवा पॉवरलिफ्टर वेदांत दिनेश नागवेकर याने डब्ल्यूआरपीएफ (WRPF) ओपन वेस्ट झोन पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप-२०२६ या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या ताकदीची छाप पाडली आहे.

अवघ्या १७ वर्षीय वेदांतने ६७.५ किलो सब-ज्युनिअर गटात स्पर्धा खेळताना स्क्वॅटमध्ये १७५ किलो, बेंच प्रेसमध्ये ७५ किलो आणि डेडलिफ्टमध्ये २०० किलो असे मिळून एकूण ४५० किलो वजन उचलत उत्कृष्ट प्रदर्शन केले.

ही स्पर्धा ४ व ५ जुलै २०२६ रोजी मुंबईतील सीईटीटीएम, हिरानंदानी गार्डन्स, पवई येथे महाराष्ट्र रॉ पॉवरलिफ्टिंग असोसिएशन (MRPA) यांच्या आयोजनाखाली पार पडली. विशेष



म्हणजे, ही स्पर्धा WRPF इंटरनॅशनल चॅम्पियनशिप-२०२६ साठीची अधिकृत पात्रता स्पर्धा असल्याने देशभरातील नामांकित पॉवरलिफ्टर्सनी यात सहभाग घेतला होता.

दिघी गावाशी घट्ट नाळ जुळलेल्या वेदांतच्या या यशामुळे श्रीवर्धन तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध सराव आणि जिद्दीच्या बळावर त्याने हे यश संपादन केले असून, आगामी काळात आंतरराष्ट्रीय स्तरावरही तो राज्य आणि देशाचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# तुकडू कांबळे यांची थेट ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे मंत्रालय मुंबई यांच्या कार्यालयात थेट तक्रार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : मुंबई- दिनांक 25 जून 2026 ला तुकडू किसन कांबळे राहणार पहेला यांचे घरकुल पाण्याच्या मजुरीचे 28 हजार रुपये मागील 1 वर्षापासून न मिळाल्यामुळे व भंडारा पंचायत समिती स्तरावर दखल न घेतल्यामुळे प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस




सरचिटणीस संजीव भांबोरे यांनी थेट ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे मंत्रालय मुंबई यांच्या कार्यालयात थेट तक्रार दाखल केली. वरिष्ठ स्तरावरून काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# पारगाव डुंगी येथील घरांमध्ये पाणी शिरून ग्रामस्थांचे नुकसान, तहसीलदारांनी केली पाहणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : मागील काही दिवसांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे मौजे पारगाव डुंगी येथील घरांमध्ये पाणी शिरून ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. डुंगी गावातील गंभीर परिस्थितीची दखल घेत तहसीलदार पनवेल मीनल भोसले-भामरे यांनी गावाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली व सिडको प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून दि. ६ जुलै २०२६ रोजी सिडको प्रशासनाकडून पारगाव डुंगी गावासाठी तात्पुरत्या पुनर्वसनाचा निधी मंजूर करून घेतला आहे. हा निधी तात्काळ ग्रामस्थांना धनादेशाद्वारे वितरित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

दरम्यान, सततच्या पावसामुळे कोळखे ग्रामपंचायत हद्दीतील पारपुंड गावातील रहदारी वस्तीतही पूराचे पाणी शिरले. याची माहिती मिळताच तहसीलदार मीनल भोसले-भामरे यांनी घटनास्थळी भेटदेऊन पूरस्थितीची पाहणी केली. त्यांनी स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या



# श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा.जानराव देशमुख यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**रिसोड(प्रतिनिधी) रणजितसिह. ठाकूर:** रिसोड येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजयराव देशमुख हे सेवानिवृत्त झाल्यानंतर रिक्त झालेल्या प्राचार्य पदावर प्रा. जानराव देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्था, वाशिमचे अध्यक्ष तथा अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ॲड.किरणराव सरनाईक यांच्या आदेशानुसार प्रा. जानराव देशमुख यांनी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला.

प्रा.जानराव देशमुख यांनी यापूर्वी विविध शैक्षणिक जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या असून त्यांचा प्रशासकीय अनुभव, शैक्षणिक दृष्टीकोन आणि विद्यार्थी-केंद्रित कार्यपद्धतीचा लाभ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीस होईल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



त्यांच्या नियुक्तीबद्दल प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# देवणी शहरात भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ABC मोहीम राबविण्याची नागरिकांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी नगरपंचायत हद्दीतील शहरामध्ये भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट झाल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थी भयभीत झाले आहेत. अनेक ठिकाणी भटक्या कुत्र्यांचे कळप रस्त्यांवर फिरत असल्याने पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नगरपंचायतीने तातडीने उपाययोजना कराव्यात,



सर्वोच्च न्यायालयाने City Hounded by Strays, In Re (2026 SCC OnLine SC 894) या प्रकरणात तसेच Animal Birth Control (ABC) Rules, 2023 ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांनी भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (Sterilization), रेबीज प्रतिबंधक लसीकरण (Anti-Rabies Vaccination) आणि वैज्ञानिक पद्धतीने लोकसंख्या नियंत्रण करावे, असे स्पष्ट केले आहे. कुत्र्यांना विनाकारण मारणे किंवा क्रूरतेने वागविणे कायद्याने मान्य नसून, त्यांच्या जन्मदरावर नियंत्रण ठेवण्यासाठी ABC कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची असल्याचेही न्यायालयाने नमूद केले आहे.

देवणी शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येचा विचार करून नगरपंचायतीने पशुवैद्यकीय विभागाच्या समन्वयाने विशेष मोहीम हाती घ्यावी,

भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून जोर धरत आहे.

# बाबा ताजउद्दीन यांचा १०४ वा वार्षिक उर्स सुरू

## ८ जुलै ते १९ जुलै या कालावधीत आयोजन; देश-विदेशातून लाखो भाविक येण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** सुफी संत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजउद्दीन (रहमतुल्ला अलैह) यांचा १०४ वा वार्षिक उर्स शरीफ ८ जुलै ते १९ जुलै २०२६ या कालावधीत ताजबाग शरीफ येथे अत्यंत श्रद्धा आणि भक्तीभावाने साजरा केला जाणार आहे. उर्स दरम्यान, बाबा ताजउद्दीन यांच्या पवित्र दर्ग्यावर (मजार शरीफ) नमन करण्यासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक (जायरीन) ताजबाग येथे दाखल होतील.

वार्षिक उर्सनिमित्त धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे उत्साहाने आयोजन केले जाईल. दर्गा परिसरातील दैनंदिन कार्यक्रमांमध्ये मिलाद शरीफ, धार्मिक प्रवचने (तक्रीर), आंतरराष्ट्रीय कव्वाली सादरीकरण, महफिल-ए-झिक्र (आध्यात्मिक सभा), नात-ओ-मनकबत (भक्तीपर काव्य), सलात-ओ-सलाम (अभिवादन) आणि दुआ (प्रार्थना) यांचा समावेश असेल. तसेच, देशाच्या कल्याणासाठी आणि सुरक्षिततेसाठी विशेष सामूहिक प्रार्थनाही केली जाईल.

**८ जुलै रोजी ध्वजारोहण सोहळा (परचम कुशाई) आणि उद्घाटन**

बाबा ताजउद्दीन यांचा वार्षिक उर्स ८ जुलै रोजी पारंपरिक ध्वजारोहण सोहळ्याने (परचम कुशाई) सुरू होईल. सकाळी ९:०० वाजता दर्गा परिसरात श्रीमंत पंचम राजे रघुजी भोसले यांच्या हस्ते पारंपरिक ध्वजारोहण केले जाईल. हा कार्यक्रम सय्यद युसूफ इक्बाल ताजी (दर्ग्याचे सज्जादानशीन), मुफ्ती अब्दुल कादिर खान (अमीर-ए-शरीयत), मौलाना सय्यद आले मुस्तफा कादरी मुसावी (हैदराबाद) आणि हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे पदाधिकारी व विश्वस्त - जसे की अध्यक्ष श्री प्यारे झिया खान, सचिव श्री ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकर आणि विश्वस्त श्री फारुखभाई बावला, श्री हाजी इम्रान खान ताजी, श्री गजेंद्रपाल सिंग लोहिया व श्री मुस्तफाभाई टोपीवाला - तसेच श्री सय्यद मोबिन ताजी (अध्यक्ष, हजरत बाबा ताजुद्दीन दर्गा खुद्दाम कमिटी) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडेल. त्यानंतर, दर्गा



परिसरात वार्षिक उर्सचा उद्घाटन सोहळा होईल. त्याच दिवशी रात्री १० वाजता, दर्गाजवळील कार्यक्रम स्थळी 'आंतरराष्ट्रीय सुफी परिषद' आयोजित केली जाईल, ज्यामध्ये मौलाना सय्यद आले मुस्तफा कादरी मुसावी यांचे मार्गदर्शन लाभेल. ताजबाग शरीफ येथे हजरत बाबा ताजुद्दीन (रहमतुल्ला अलैह) यांच्या १०४ व्या वार्षिक उर्सची तयारी अंतिम टप्प्यात आहे. ट्रस्टने देश-विदेशातील भाविकांना उर्स शरीफमध्ये सहभागी होण्याचे आणि बाबांची आध्यात्मिक कृपा व आशीर्वाद प्राप्त करण्याचे आवाहन केले आहे.

**वार्षिक उर्सचे प्रमुख कार्यक्रम**

- गुरुवार, ९ जुलै, रात्री १० वाजता: मिलाद शरीफ आणि धार्मिक प्रवचन (तकरीर). या कार्यक्रमात जगप्रसिद्ध धार्मिक विद्वान मौलाना मुहम्मद अहमद नक्शबंदी साहेब किब्ला (हैदराबाद) यांचे मार्गदर्शन होईल.

- शुक्रवार, १० जुलै, रात्री १० वाजता: मिलाद शरीफ आणि आंतरराष्ट्रीय कव्वाली सत्र; यात आंतरराष्ट्रीय कव्वाली पथकाची प्रस्तुती होईल.

- शनिवार, ११ जुलै, रात्री १० वाजता: मिलाद शरीफ आणि आंतरराष्ट्रीय कव्वाली सत्र; यात मुंबईचे कव्वाल मुस्तफा नाझरी यांची प्रस्तुती होईल.

- रविवार, १२ जुलै, सकाळी १० वाजता: हजरत बाबा ताजुद्दीन कार्यालय संकुलातून 'दरबारी शाही संदल' मिरवणुकीची सुरुवात होईल. त्यानंतर, रात्री १० वाजता 'मिलाद शरीफ' आणि आंतरराष्ट्रीय कव्वालीचे सत्र आयोजित केले जाईल, ज्यामध्ये प्रसिद्ध कव्वाल रईस अनीस साबरी यांची कलाकृती सादर केली जाईल.

- सोमवार, १३ जुलै, सकाळी ९ वाजता: *छोटा कुल शरीफ*; रात्री १० वाजता: मिलाद शरीफ, आंतरराष्ट्रीय *नातिया* आणि *मनकबत मुशायरा* (काव्य संमेलन) तसेच कव्वाली.

- मंगळवार, १४ जुलै, रात्री १० वाजता: मिलाद शरीफ आणि धार्मिक प्रवचन. या कार्यक्रमात 'शहजादा-ए-गौस-ए-आझम' हजरत अल्लामा मौलाना सय्यद अमीनुल कादरी साहेब किब्ला (मालेगाव) यांचे मार्गदर्शन लाभेल.

- बुधवार, १५ जुलै, सकाळी ९ वाजता: *बडा कुल शरीफ*. या दिवशी रात्री १० वाजता मिलाद शरीफचे आयोजन केले जाईल. तसेच, बॉलीवूडचे सुफी गायक सलमान अली यांचा विशेष कार्यक्रमही होईल.

- गुरुवार, १६ जुलै, रात्री १० वाजता धार्मिक प्रवचन (*तकरीर*) होईल, ज्यामध्ये मुफ्ती सलमान अझहरी साहेब किब्ला (मुंबई) यांचे मार्गदर्शन लाभेल.

- शुक्रवार, १७ जुलै, रात्री १० वाजता आंतरराष्ट्रीय *मुशायरा* (काव्य संमेलन) आयोजित केला जाईल.

- शनिवार, १८ जुलै, रात्री १० वाजता आंतरराष्ट्रीय *कव्वाली* कार्यक्रम होईल, ज्यामध्ये कव्वाल अल्तमश फरीदी यांची कलाकृती सादर केली जाईल.

- रविवार, १९ जुलै, रात्री १० वाजता *महफिल-ए-समा* (आध्यात्मिक संगीत सभा) आणि विशेष प्रार्थना (*दुआ*) आयोजित केली जाईल. मौलाना सय्यद आलमगीर अश्रफ साहेब प्रार्थनेचे नेतृत्व करतील.

**सोयीसुविधा आणि सुरक्षेसाठी व्यापक व्यवस्था: श्री प्यारे खान**

हजरत बाबा ताजउद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष श्री प्यारे झिया खान यांनी सर्व भाविकांना (*झायरीन*) आवाहन केले आहे की, उर्स दरम्यान शिस्त पाळावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे. त्यांनी सांगितले की, भाविकांच्या सोयीसाठी आणि सुरक्षेसाठी व्यापक व्यवस्था करण्यात आली आहे. परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे, वैद्यकीय मदत, पिण्याचे पाणी, स्वच्छता, वाहनतळ आणि वाहतूक व्यवस्थापन यांसाठी विशेष सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. लाखो भाविकांना सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात बाबांच्या दर्ग्याचे दर्शन घेता यावे, यासाठी नागपूर पोलीस आणि जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने व्यापक सुरक्षा उपाययोजना राबविल्या जात आहेत.

**'उर्स' यात्रा: आणखी एक आकर्षण**

'उर्स' उत्सवाच्या निमित्ताने आयोजित केली जाणारी पारंपरिक 'उर्स' यात्रा (मेळा) देखील ८ जुलै ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत भरेल. या यात्रेत खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, घरगुती वस्तू, मनोरंजनाचे पाळणे आणि इतर मनोरंजनात्मक उपक्रम असतील, ज्याचा लाभ मोठ्या संख्येने लोकांना मिळेल.

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने ठाणेदार राजेश खेरडे यांना विविध जनहिताच्या मागण्यांचे निवेदन!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने मालेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार राजेश खेरडे यांना विविध जनहिताच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. समाजात वाढत असलेल्या विविध सामाजिक समस्यांवर प्रभावी उपाययोजना करून सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित व न्यायपूर्ण वातावरण मिळावे, या उद्देशाने हे निवेदन देण्यात आले.संघटनेचे जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनामध्ये मालेगाव शहरासह पोलीस स्टेशन हद्दीतील ग्रामीण भागामध्ये सुरू असल्याची तक्रार असलेल्या वर्ली मटका, हातभट्टी दारू, देशी-विदेशी दारूची बेकायदेशीर विक्री, गुटखा व इतर बेकायदेशीर व्यवसायांविरुद्ध सातत्याने धडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. अशा प्रकारांमुळे युवकांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असून अनेक कुटुंबांवर त्याचा गंभीर



**'मालेगाव पोलीस स्टेशन हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे हे आमचे प्राधान्य आहे. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेतली जाईल. कायद्याच्या विरोधात सुरू असलेल्या कोणत्याही गैरप्रकाराची माहिती मिळाल्यास नियमानुसार चौकशी करून आवश्यक ती कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे.'**
**— ठाणेदार राजेश खेरडे, मालेगाव पोलीस स्टेशन**

परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.युवकांचे शिक्षण, रोजगार आणि भवितव्य धोक्यात येत असून अनेक संसार उद्ध्वस्त होत आहेत. काही ठिकाणी आई-वडिलांकडे दुर्लक्ष, कौटुंबिक वाद आणि सामाजिक अस्वस्थता वाढताना दिसत असल्याने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे संघटनेने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

यावेळी जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांनी सांगितले की, निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ हा समाजहितासाठी सातत्याने कार्य करणारा संघ असून अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम संघटना सातत्याने करत आहे. समाजात कायद्याचा आदर निर्माण होऊन नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, हीच संघटनेची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या प्रसंगी दैनिक समतापथचे रिसोड-मालेगाव तालुका प्रतिनिधी गोपाल पाटील बोरकर उपस्थित होते.निवेदन स्वीकारताना ठाणेदार राजेश खेरडे यांनी जनतेच्या तक्रारींना प्राधान्य देत कायद्याच्या चौकटीत आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे सकारात्मक आश्वासन दिले. नागरिकांच्या सहकार्याने शांतता, सुव्यवस्था आणि कायद्याचे राज्य अधिक प्रभावी करण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ ही संघटना महाराष्ट्रासह देशभरात सामाजिक न्याय, जनजागृती आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असून राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय गणेशजी कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे कार्य अधिक व्यापक होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# प्रा. संध्या जंजाळ यांना मराठी विषयात पीएच.डी

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागांव - यवतमाळ** : येथील मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रा.संध्या जंजाळ यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएच.डी पदवी प्रदान केली.

आखाडा बाळापूर येथील कै.नारायणराव वाघमारे महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.माधव जाधव यांच्या मार्गदर्शनात"मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीतील स्त्री चित्रण: एक विवेचक अभ्यास "(विशेष संदर्भ -बी.रघुनाथ, डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, रा .र .बोराडे ,गणेश आवटे यांच्या कादंबऱ्या )या विषयावर आपले संशोधन स्वारातीम विद्यापीठात सादर केले होते. शोध प्रबंधाचे बाह्य परीक्षक म्हणून श्रीमंती नरसम्मा कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील मराठी विभाग प्रमुख डॉ.अण्णा पी. वैद्य यांनी काम पाहिले .सोमवार 29 जून रोजी "भाषा ,साहित्य व संस्कृती अभ्यास संकुल "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे मौखिक परीक्षा पार पडली .

दरम्यान प्रा.संध्या जंजाळ यांनी मराठी विषयात पीएचडी पदवी प्राप्त केल्याबद्दल मातोश्री



विद्यालयाचे अध्यक्ष दिगंबर जगताप ,प्राचार्य अनुताई गावंडे ,जगदीश कदम चितांगराव कदम सर्व प्राध्यापक मित्र तसेच प्रा.संध्या जंजाळ यांचे कुटुंबीय आणि सर्व मित्रांनी या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत .त्यांनी या यशाचे श्रेय या मार्गदर्शक प्रा.माधव जाधव तसेच कुटुंबीय आणि स्नेही मित्रपरिवारास

# जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक; 'राजकीय समीकरणां'चा पेच की 'शेतकरी हिता'ला प्राधान्य?

छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचा निकाल 'शेतकरी विकास पॅनेल'च्या बाजूने लागला आहे. मतदारांनी आपला कौल दिल्यानंतर, आता जिल्ह्याचे लक्ष बँकेच्या आगामी अध्यक्षपदाच्या निवडीकडे लागले आहे. ही केवळ एक वैधानिक प्रक्रिया नसून, ती बँकेच्या आगामी पाच वर्षांच्या धोरणात्मक वाटचालीची दिशा ठरवणारी ठरणार आहे.

बँकेची आर्थिक स्थिती आणि विश्वस्त जबाबदारी

जिल्हा मध्यवर्ती बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे. सहकार कायद्याच्या तरतुदींनुसार, या संस्थेचे कामकाज चालवताना 'फिड्युशियरी ड्युटी' (विश्वस्त जबाबदारी) पाळणे हे संचालक मंडळाचे मुख्य कर्तव्य आहे. अध्यक्षपद ही सत्तेची खुर्ची नसून, शेतकऱ्यांच्या ठेवी आणि सहकार चळवळीच्या वारशाचे रक्षण करण्याची मोठी नैतिक जबाबदारी आहे.

**•कर्जवाटप आणि वसुलीचा समतोल•**

शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज उपलब्ध करून देणे हे बँकेचे प्रथम कर्तव्य आहे. मात्र, कर्जवाटपातील पारदर्शकता आणि वसुली करताना सहकार कायद्याचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. बँकेचा 'एनपीए' (NPA) कमी करण्यासाठी प्रभावी धोरणे आखतानाच, प्रामाणिक कर्जदारांना




दिलासा देणे आणि बुडीत कर्जदारांवर नियमानुसार कारवाई करणे, असा समतोल साधणे हे नवीन अध्यक्षांसमोरील मोठे आव्हान असेल. संस्थेची आर्थिक सुदृढता टिकवून शेतकऱ्यांचा 'आर्थिक कणा' मजबूत करणे, हीच काळाची गरज आहे.

**•नेतृत्वाचे निकष आणि सुशासनाची अपेक्षा•**

बँकेच्या अध्यक्षांना ताळेबंदातील (Balance Sheet) गुंतागुंत आणि सहकार कायद्यातील बारकावे यांची सखोल जाण असणे अनिवार्य आहे. केवळ तांत्रिक सक्षमतेपेक्षा प्रशासकीय पारदर्शकता आणि सुशासन (Good Governance) देणे, हीच नवीन नेतृत्वाची खरी कसोटी असेल. राजकीय तडजोडींच्या पलीकडे जाऊन, सक्षम आणि अभ्यासपूर्ण नेतृत्वाची निवड व्हावी, हीच सर्व सभासदांची रास्त अपेक्षा आहे.

**•निष्कर्ष•**

अध्यक्षपद कोणाकडे जाते, यापेक्षा ते कोणत्या निकषांवर आणि कोणाच्या हितासाठी ठरवले जाते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आहे. निवडणूक ही संघर्षाची असते, पण बँकेचा कारभार सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा असतो. जिल्हा बँक आपल्या सहकार मूल्यांच्या शिखरावर विराजमान व्हावी आणि शेतकऱ्यांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा, हीच निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर व्यक्त होणारी सामूहिक अपेक्षा आहे.

**- योगेश पालोदकर**
**जिल्हा प्रतिनिधी, दै. युवक आधार, छत्रपती संभाजीनगर.**

# २२ जुलै ते २२ ऑगस्टदरम्यान राज्यभर 'कृषी महोत्सव'चे आयोजन – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई** : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील शेतकऱ्यांसाठी २२ जुलै ते २२ ऑगस्ट या कालावधीत कृषी विभागामार्फत राज्यभर 'कृषी महोत्सव' आयोजित करण्यात येणार असून, या महोत्सवाचे सविस्तर आणि प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कृषी विभागाला दिले.



मंत्रालयातील दालनात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कृषी महोत्सवाच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, दूरदृश्य प्रणालीद्वारे कृषी आयुक्त सूरज मांढरे, स्मार्टचे संचालक एम. जे. प्रदीप चंद्रन,नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजना प्रकल्प संचालक मीनल करनवार, कृषी संचालक रफीक नाईकवडी, अविनाश बोरकर, विनयकुमार अवटी, सर्व विद्यापीठांचे कुलगुरू तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कृषीमंत्री भरणे म्हणाले की, यंदाचे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून साजरे करण्यात येत असून, महिला शेतकरी विधेयकही विधिमंडळात सादर करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी महोत्सवात महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य देत त्यांच्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि विविध कृषीविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

ते पुढे म्हणाले की, पेरणीचा हंगाम पूर्ण झाल्यानंतर आयोजित होणाऱ्या या महोत्सवात आधुनिक कृषी तंत्रज्ञान, अत्याधुनिक कृषी अवजारे, यांत्रिकीकरण, पीक व्यवस्थापन, मूल्यवर्धन आणि कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे प्रदर्शन भरविण्यात यावे. या माध्यमातून शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळून आधुनिक शेतीचा स्वीकार करण्यास चालना मिळेल.राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करून कृषी महोत्सव प्रभावीपणे राबविण्यात यावा, अशा सूचनाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# राज्यात पुढील पाच दिवस वादळी पावसाचा इशारा

## नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन

**मुंबई :** मुंबई वेधशाळेने राज्यासाठी पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, विविध भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.७ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट आणि पुणे घाट परिसरासाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे.

७ जुलै रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूरघाट,अहिल्यानगर, धुलेजळगाव, वाशीम आणि वर्धा, नागपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ठाणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, बुलडाणा, अकोला, सातारा घाट आणि अमरावती येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

८ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर घाट, बुलडाणा, अकोला, अमरावती आणि वर्धा येथे यलो अलर्ट राहणार असून, पुणे घाट आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट असेल.

९ जुलै रोजी रत्नागिरी, सातारा घाट, पुणे घाट, खंडाळा घाट, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.

१० जुलै रोजी वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट कायम राहणार आहे. ११ जुलै रोजी अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.

मुंबई वेधशाळेने नागरिकांनी स्थानिक प्रशासन व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

# उरणला पाण्याचा दिलासा; रानसई धरण पूर्ण क्षमतेने भरले



**उरण :** उरण तालुक्यातील नागरिक आणि औद्योगिक विभागाला पाणी पुरवठा करणारे रानसई धरण अखेर रविवारी रात्री उशिराने भरलं. अवघ्या पाच दिवसाच्या जोरदार पावसाने हे धरण भरलं आहे. हा आज पर्यंतचा रेकॉर्ड आहे. जून महिना कोरडा गेल्याने उरणकारांची पाणी चिंता वाढली होती. त्यामुळे नियमितपणे पाणी कपात असलेल्या मंगळवार आणि शुक्रवार खेरीज एमआयडीसी ने जादाची रविवारचीही पाणी कपात लागू केली होती. रानसई धरण याची ११६ फूट उंची असलेल्या धरणात ८६ फूट ही मृतसाठ्याची पातळी आहे.

ही पातळी खालावून ती ८१ फुटांवर पोहचली होती. त्यामुळे पाणी चिंता आणखी वाढली होती. मात्र जुलै मध्ये मोसमी पावसाने जोडरदार आगमन केल्याने एमआयडीसीने रविवारची पाणी कपात रद्द केली होती. त्यामुळे नागरीकांना दिलासा मिळाला असून पुढील काळात उरणकारांची दोन दिवसांची पाणी कपात ही रद्द होणार आहे. रानसई धरणाची पातळी खालावल्याने येथील नागरिकांना नोव्हेंबर महिन्यापासूनच वर्षोनुवर्षे पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. धरणाची पाणी क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेकवर्षे धूळखात बसला आहे.

ही स्थिती बदलून उरणला पाणीदार करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. उरण तालुक्यातील नागरिकांना व येथील उद्योगासाठी लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जात असून उरणकराना दररोज ४१ दश लक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे. मात्र एमआयडीसी कडे केवळ ३० दश लक्ष लिटर पाणीच असल्याने दररोज १० दश लक्ष लिटर पाणी कमी पडत असल्याने हा पाणी पुरवठा जून महिन्या पर्यंत पाणी पुरवठा करता यावा यासाठी पाणी कपात केली जात आहे.

१९६० च्या दरम्यान उरण मध्ये संरक्षण विभागाच्या शस्त्रागारा साठी उरणच्या पूर्व विभागातील दिघोडे परिसरात रानसई धरणाची उभारणी करण्यात आली. याच धरणातून येथील ग्रामपंचायतींनाही पाणी पुरवठा करण्यात येऊ लागला. मात्र हे धरण प्रामुख्याने औद्योगिक विभागाला लागणारं पाणी पुरविण्यासाठी तयार करण्यात आले. त्यानुसार शास्त्रागारा नंतर,आलेल्या ओ एन जी सी चा तेल शुद्धिकरण प्रकल्प,वीज निर्मितीचा वायू विधुत केंद्र तसेच भारत पेट्रोलियम चा घरगुती सिलेंडर भरणा प्रकल्प या औधोगीक प्रकल्पा साठी त्याच प्रमाणे उरण शहर व नगरपालिका यांनाही पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी रानसई धरणावरच येऊन पडली.मात्र गेल्या ६० वर्षात धरणातील पाण्याची मागणी वाढली असली तरी रानसई धरणातील पाणी साठा कमी कमी होत गेला.धरणाची स्थापित क्षमता १० दशलक्ष घनमीटर असली तरी ती घटून सध्या ७ दश लक्ष घनमीटर पेक्षा कमी झाली आहे.

# कळंबोलीतून वाहतूक थांबवली

## एक तासानंतर एक्सप्रेसवेवर हालचाल सुरू



**पनवेल :** मुंबई–पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक परिसरात दरड कोसळणे आणि महामार्गावर अनेक ठिकाणी पाणी साचल्यामुळे निर्माण झालेला वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सोमवारी सकाळी कळंबोली येथून द्रुतगती महामार्गावरील वाहतूक सुमारे एक तासासाठी बंद करण्यात आली. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर वाहतूक पोलिसांनी एक तासाच्या उसंतीनंतर पावणेदहा वाजता महामार्गावरील एक मार्गिका वाहनांसाठी सुरू केली असून वाहतूक टप्प्याटप्प्याने सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे लोणावळा येथील मिसिंग लिंक परिसरात दरड कोसळली. तसेच द्रुतगती महामार्गावर अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता. रविवारी रात्रीपासून पावसाबरोबरच वाऱ्याचाही वेग वाढल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरड कोसळलेल्या ठिकाणी युद्धपातळीवर काम सुरू झाले. दरम्यान वाहनांची संख्या आणखी वाढू नये आणि महामार्गावरील ताण कमी व्हावा, यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी कळंबोली येथून सुरू होणारी वाहतूक सुमारे एक तासासाठी थांबवली. त्यानंतर परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाल्यानंतर एक मार्गिका सुरू करण्यात आली. या मार्गिकेतून वाहने नियंत्रित पद्धतीने सोडली जात असून वाहतुकीवर सतत लक्ष ठेवले जात आहे.

नवी मुंबई वाहतूक पोलीस दलाचे उपायुक्त राहुल खाडे यांनी नागरिकांना अत्यावश्यक कारणाशिवाय प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे. मुंबई–पुणे तसेच मुंबईहून गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांनी शक्य असल्यास प्रवास पुढे ढकलावा किंवा वाहने बाजूला लावून उसंत घ्यावी. जुन्या मुंबई–पुणे महामार्गाचा वापर करावा.मात्र त्या मार्गावरही वाहतुकीचा ताण असल्याने सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कळंबोली सर्कल परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या असून वाहतूक पोलिसांकडून ध्वनिक्षेपकाद्वारे वाहनचालकांना पर्यायी मार्गांची माहिती दिली जात आहे.

# पावसाळी पर्यटनाचा धोका!

## खारघरमध्ये दोन तरुणांचा बुडून मृत्यू

**पनवेल :** खारघर परिसरातील डोंगररांगांमधून वाहणारे पावसाळी धबधबे पर्यटक आणि तरुणांना आकर्षित करत असले, तरी निष्काळजीपणामुळे या ठिकाणी सातत्याने बुडून मृत्यूच्या घटना घडत आहेत. गेल्या दोन दिवसांत खारघर परिसरात पाण्यात बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने पुन्हा एकदा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.शुक्रवारी सायंकाळी तळोजा येथे राहणारा २० वर्षीय मोहम्मद मोबशीर मोहम्मद शाहिद याचा खारघर परिसरातील पाण्यात बुडून मृत्यू झाला. त्यानंतर शनिवारी सकाळी मुंबईतील सांताक्रुझ येथील १९ वर्षीय शेण्णोन गॅस्पर किनी याचाही अशाच प्रकारे मृत्यू झाला. दोन्ही घटनांनंतर अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. संबंधित तरुणांना वाचविण्याचे प्रयत्न करण्यात आले; मात्र त्यात यश आले नाही.खारघर परिसरातील डोंगररांगांमधून वाहणारे पावसाळी धबधबे आणि नैसर्गिक जलसाठे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांना आकर्षित करतात. मात्र या ठिकाणी पाण्याचा खोलीचा अंदाज न येणे, वेगवान प्रवाह आणि सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे वारंवार अपघात घडत असल्याचे दिसून येत आहे.गेल्या दहा वर्षांत खारघर परिसरात पाण्यात बुडून मृत्यू झालेल्यांची संख्या १६ वर पोहोचली आहे. यापूर्वी मंगळवारी खारघर येथील भारती विद्यापीठ महाविद्यालयाच्या मागील खदाणीत मुंबईहून पोहण्यासाठी आलेल्या १६ वर्षीय विद्यार्थ्याचाही बुडून मृत्यू झाला होता.

# पश्चिम रेल्वे मार्गिकेवर गाड्या विस्कळीत




**भाईंदर :** मुंबईसह उपनगरात सोमवारी सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका पश्चिम रेल्वे मार्गिकेला बसला आहे. डहाणू ते चर्चगेटदरम्यान धावणाऱ्या अनेक उपनगरी गाड्या अर्धा ते एक तास उशिराने धावत असल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत असून विविध स्थानकांवर प्रवाशांची गर्दी वाढली आहे.

गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे पश्चिम रेल्वे मार्गिकेवरील काही ठिकाणी वारंवार रुळांवर पाणी साचत आहे. त्यामुळे पाण्याचा निचरा करण्याबरोबरच रुळांची देखभाल आणि दुरुस्तीची कामे रेल्वेकडून सुरू आहेत. सोमवारी सकाळपासून पावसाचा जोर कायम राहिल्याने रेल्वे वाहतुकीवर त्याचा थेट परिणाम झाला.डहाणूहून पहाटे आणि सकाळच्या वेळेत सुटणाऱ्या अनेक लोकल गाड्या संथ गतीने धावत असल्याने त्या पुढील सर्व स्थानकांवर उशिराने पोहोचत आहेत. परिणामी नालासोपारा, वसई, विरार, भाईंदर, मिरा रोड, बोरीवली आदी स्थानकांवर प्रवाशांना अर्धा ते एक तास प्रतीक्षा करावी लागत आहे. कार्यालयीन वेळ असल्याने स्थानकांवर गर्दी होऊ लागली आहे.

वसई स्थानक परिसरात यापूर्वीप्रमाणे रुळांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची समस्या काहीशी कमी झाली असली, तरी खबरदारीचा उपाय म्हणून गाड्या संथ गतीने चालविण्यात येत आहेत. त्यामुळे संपूर्ण वेळापत्रक विस्कळीत झाले असून त्याचा परिणाम पुढील सर्व लोकल सेवांवर होत आहे. दुसरीकडे, बोरीवली ते चर्चगेटदरम्यान धावणाऱ्या काही लोकल सेवा तुलनेने नियमित वेळेनुसार सुरू असल्याचे दिसून आले.

शाळा तसेच काही खासगी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली असली, तरी अत्यावश्यक कामांसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असल्याने रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची वर्दळ कायम आहे. दरम्यान, पुढील काही तासांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असून, अत्यावश्यक काम असल्याशिवाय प्रवास टाळावा, तसेच रेल्वे प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# ढग आहेत, पण पाऊस नाही; अमरावतीत शेतकऱ्यांची चिंता वाढली

**अमरावती :** पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांमध्ये मंगळवारी मुसळधार पाऊस कोसळेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता. मात्र, ढगाळ वातावरण आणि काहीसा रिमझिम पाऊस वगळता विशेष असा पाऊस कुठेही झाला नाही. आता केवळ दोन दिवस पावसाचा अंदाज आहे. ९ जुलैनंतर मात्र विदर्भात पावसाची तीव्रता अतिशय कमी राहणार, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

पावसाची प्रतीक्षाच - जून महिन्यात हवा तसा पाऊस झाला नाही. जुलै महिन्याचा पहिला आठवडा संपत आला असताना देखील अमरावती जिल्ह्यात जोरदार पावसाची नोंद कुठेही झालेले नाही. असं असताना १० जुलैपर्यंत पाऊस बरसेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. हवामान खात्याच्या या अंदाजानुसार, अनेक शेतकऱ्यांनी शेतात पेरणीची कामं आटोपली. पावसाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांना सात आणि आठ जुलैला दमदार पाऊस बरसणार, अशी हवामान खात्याच्या अंदाजानुसार अपेक्षा होती. आज सात जुलैला मात्र जिल्ह्यात कुठेही दमदार पाऊस बरसला नाही. पुढील 48 तासात पाऊस बरसण्याची



प्रतीक्षा शेतकऱ्यांना लागली आहे.

सकाळपासून ढगाळ वातावरण - मंगळवारी पहाटे तीन वाजता अमरावती शहरात रिमझिम पावसाला सुरुवात झाली. सकाळी पाच वाजल्यापासून मात्र पावसाचा अधूनमधून शिरकाव येत आहे. सकाळपासूनच अमरावती शहरात ढगाळ वातावरण आणि गार वारा वाहतो आहे. मुसळधार पाऊस कोसळेल, असं वातावरण भासत असलं तरी विशेष असा पाऊस अमरावती शहरात बरसला नाही.


मेळघाटातही पाऊस झाला नाही - जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये अशीच परिस्थिती आहे. धारणी आणि चिखलदरा या सातपुडा पर्वत रांगेत असणाऱ्या तालुक्यांमध्ये दमदार पाऊस अद्याप बरसलेला नाही. मंगळवारी सकाळी धारणी आणि चिखलदरा या दोन्ही शहरात पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. मात्र, अपेक्षेप्रमाणे मेळघाटातही पाऊस झाला नाही. सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असणाऱ्या वरुड आणि मोर्शी तालुक्याची देखील परिस्थिती अशीच आहे. या दोन्ही तालुक्यात देखील अद्याप पावसाचे प्रमाण अतिशय कमी आहे.

सात तालुक्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस - जिल्ह्यातील एकूण १२ तालुक्यांपैकी भातकुली, अचलपूर, धामणगाव रेल्वे, अमरावती, वरुड, चांदुर रेल्वे आणि चिखलदरा या तालुक्यात पावसाची टक्केवारी सरासरीच्या तुलनेत अत्यंत कमी आहे.

गुरुवारपासून पावसाची तीव्रता कमी - मंगळवारी अमरावती जिल्ह्यात मुसळधार ते जोरदार पाऊस बरसेल, असा ऑरेंज अलर्ट आहे. मात्र, आज विशेष असा पाऊस बरसला नाही. आता मंगळवारी जोरदार पाऊस होईल, असा अंदाज आहे. जर आजच्यासारखाच उद्या देखील पाऊस बरसला नाही तर परिस्थिती थोडीशी कठीण होईल. ९ जुलैनंतर अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात पावसाची तीव्रता अतिशय कमी राहील, असं श्री शिवाजी कृषी महाविद्यालयातील हवामान विभागाचे माजी प्रमुख प्रा. अनिल बंड यांनी सांगितलं.

# ठाणे जिल्ह्यात आठवडाभरात ८३८ मिमी पावसाची नोंद

## बारवी धरणातील पाणीसाठा ३५ टक्क्यांवर



**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात गेल्या आठवडाभरात झालेल्या मुसळधार पावसामुळे एकूण ८३८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील नद्या, ओढे आणि धरणांच्या पाणीपातळीत वाढ होत असून, पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाचे असलेल्या बारवी धरणातील पाणीसाठा ३५ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे आगामी काळातील पाणीटंचाईची चिंता काही प्रमाणात कमी झाली आहे.गेल्या काही दिवसांपासून ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी, मुरबाड, शहापूर आणि उल्हासनगर परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे आणि नदीकाठच्या भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात असून आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.बारवी धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत असल्याने ठाणे जिल्ह्यासह कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर परिसराच्या पाणीपुरवठ्यासाठी ही सकारात्मक बाब मानली जात आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसही मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, नदी-नाल्यांच्या परिसरात जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.जिल्हा प्रशासनाकडून धरणातील पाणीसाठा, नदीची पातळी आणि पूरस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात असून, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने उपाययोजना करण्यासाठी संबंधित यंत्रणा सज्ज असल्याची माहिती देण्यात आली आहे.